सुविचार

तो माणूस खूप मजबूत होतो, ज्याने स्वतःच्या हातांनी स्वतःचे अश्रू पुसले असतात.

दैनिक

# आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com



सावधान..शुभमंगल घडण्यापूर्वी व्हा सावधान

पेज 3

■ www.arambhmarathi.com ■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 276 ■ मंगळवार, 16 डिसेंबर 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5 ■ epaper.arambhmarathi.com


# जिल्ह्यात १३ लाख टन उसाचे गाळप

## यंदा गाळप हंगाम तेजीत, ७ लाख ९४ हजार २३० क्विंटल साखरेचे उत्पादन

## गुळपीठी कारखान्याकडे शेतकऱ्यांची पाठ

सुभाष कुलकर्णी । आरंभ मराठी

**तेर – धाराशिव जिल्ह्यातील साखर कारखाने यंदा दोन आठवडे उशिरा सुरू झाले. त्यामुळे ऊसाचा गाळप हंगाम आता तेजीत सुरू आहे. कारखाने सुरू होऊन जवळपास एक महिना झाला. यंदा जास्त पावसामुळे कारखाने सुरू होण्यास उशीर झाला. मागील वर्षीपेक्षा यावर्षी गळीत हंगामात मोठ्या प्रमाणात ऊस गाळपासाठी उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यातील सहकारी व खाजगी साखर कारखाने जोमाने सुरू असून आतापर्यंत या कारखान्यात १३ लाख ३७ हजार ५२५ टन ऊसाचे गाळप झाले असून त्यातून ७,९४,२३० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे.**





जिल्ह्यातील बहुतांश साखर कारखाने नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात तर काही कारखान्यांनी दुसऱ्या आठवड्यात ऊस गाळप सुरूवात केली. साखर आयुक्त कार्यालयाने ४ डिसेंबर २०२५ पर्यंतचा गाळप अहवाल ८ डिसेंबर रोजी प्रसिद्ध केला. त्यानुसार साखर उताऱ्यात तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील कंचेश्वर साखर कारखान्याने बाजी मारली आहे. कंचेश्वर कारखान्याने १,२६,३८० टन ऊस गाळप करून साखरेचे १,२१,०००. क्विंटल उत्पादन घेतले आहे. या कारखान्याचा साखर उतारा जिल्ह्यात सर्वाधिक असून तो ९.४९ इतका आहे. तर रांजणी नॅचरल शुगर लाईट अँड इंडस्ट्रीज या कारखान्याने जिल्ह्यातील सर्वाधिक.२,२४,८७० टन उसाचे गाळप केले आहे. या कारखान्याने १,३७,७०० क्विंटल साखर उत्पादीत केली. त्यांचा साखर उतारा ६.८१ इतका आहे. ढोकी येथील भैरवनाथ शुगर वर्क्स संचलित तेरणा साखर कारखान्याने १.१४,४९० टन ऊस गाळप केला. त्यामधून ६४,६०० क्विंटल साखर मिळविली. तर बाणगंगा साखर कारखाना ईडा जवळा (ता. परंडा) या कारखान्याने १,४२,३७० टन ऊस गाळप करून २६,१६० क्विंटल साखर उत्पादन केले. धाराशिव तालुक्यातील केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेतकरी सहकारी साखर कारखाना अरविंद नगर या कारखान्याने १,०३०३८ टन ऊसाचे गाळप केले. आंबेडकर कारखान्याने ६४,८०० क्विंटल साखरेचे उत्पादन केले. भाऊसाहेब बिराजदार साखर कारखान्याचे १,५८,५६० टन गाळप झाले त्यातून ४०,९०० क्विंटल साखर उत्पादीत करण्यात आली. कळंब तालुक्यातील चोराखळी येथील धाराशिव साखर कारखान्याने ६६,९०० टन गाळपासाठी आलेल्या उसातून ४९,३५० क्विंटल साखर तयार केली. डी.डी.एन हावरगाव यांनी ८१,४०७ टन ऊस गाळपासाठी आणला. या कारखान्याने ५९,०२० क्विंटल साखर उत्पादन केले. याशिवाय भिमाशंकर शुगर मिल पारगाव या साखर कारखान्यातून ११,४३० क्विंटल साखर तयार केली. या कारखान्याने १,८६००० टन ऊस गाळप केला. सोनारीच्या भैरवनाथ शुगरने १,५१,४४५ टन ऊस गाळपासाठी आणला. त्यामधून ९४,२५० क्विंटल साखर उत्पादन झाले. शिवशक्ती साखर कारखान्याचे ५५,४०५ टन ऊस गाळप झाले व ४३,४५० क्विंटल साखर तयार केली. तर मुरूम येथील विठ्ठल साई साखर कारखान्याचे चालू हंगामात ९१,०६० टन ऊस गाळप केला. या कारखान्याने ८.२८ टक्के साखर उतारा मिळवून ८१,५७० क्विंटल साखर उत्पादन काढले. एकंदरीत जिल्ह्यातील १२ साखर कारखान्यातून १३ लाख ३७ हजार ५२५ टन ऊस गाळप करण्यात आला. त्यातून ७ लाख ९४ हजार २३० क्विंटल साखर उत्पादन झाले.

### शेतकऱ्यांचा ओढा साखर कारखान्यांकडे

जिल्ह्यात मागील दोन वर्षांपासून शेतकरी गुळपीठी कारखान्यांना मोठ्या प्रमाणावर ऊस देत होते. कारण साखर कारखान्याने दिलेला भाव आणि गुळपीठी कारखान्यांचा दर एकच होता. यंदा मात्र साखर कारखान्यांनी दराच्या बाबतीत बाजी मारली आहे. एकीकडे गुळपीठी कारखान्यांनी २५०० रुपये टन इतका भाव जाहीर केला असताना साखर कारखान्यांनी मात्र ३००० ते ३१०० पर्यंत दर जाहीर केले. त्यामुळे यावर्षी शेतकरी साखर कारखान्यांना ऊस देण्यास उत्सुक आहेत.

### दराकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष

जिल्ह्यातील बहुतांश साखर कारखान्यानी भाव जाहीर केलेला नाही. मांजरा परिवाराच्या ताब्यात असलेल्या कंचेश्वर कारखान्याने ३१०० हून अधिक दर देण्याची घोषणा केली आहे. तेवढाच दर नॅचरल शुगर कडून मिळण्याची अपेक्षा आहे. आंबेडकर कारखान्याने पहिला हप्ता २७५० रुपये जाहीर करून या स्पर्धेत उडी मारली आहे. दर देण्याची ही स्पर्धा पाहता यावर्षी सरासरी तीन हजार रुपये दर शेतकऱ्यांना मिळेल अशी अपेक्षा आहे.

## आईला गाडीचा धक्का लागल्याच्या कारणावरून वाद; तरुणाला कुटुंबासह मारहाण

**ढोकी**:–कसबे तडवळे (ता. जि. धाराशिव) येथे आईला गाडीचा धक्का लागल्याच्या कारणावरून तरुणासह त्याच्या कुटुंबीयांना बेदम मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, कसबे तडवळे येथील रहिवासी दिपक प्रभाकर कदम (वय २३) हे दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी गावात असताना त्यांच्या आईला गाडीला धक्का लागल्याच्या कारणावरून आरोपींनी वाद घातला. या वादातून सोमनाथ भगवान कोळी, स्वप्नील सोमनाथ कोळी, शिवाजी भगवान कोळी, आकाश शिवाजी कोळी आणि विजय शिवाजी कोळी (सर्व रा. कसबे तडवळे) यांनी एकत्र येत गैरकायद्याची मंडळी जमवली. आरोपींनी दिपक कदम यांना शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी तसेच विटेने मारहाण करून गंभीर जखमी केले. या वेळी दिपक कदम यांची आई बालिका कदम व भाऊ मानेश कदम यांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. आरोपींनी सर्वांना जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेबाबत दिपक प्रभाकर कदम यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून ढोकी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम 118(1), 189(2), 191(2), 190, 115(2), 352, 351(2) व 351(3) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास ढोकी पोलीस करीत आहेत.

## दरोड्याच्या तयारीत असलेली आठ जणांची टोळी जेरबंद

**ढोकी** :-ढोकी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पेट्रोल पंप चौक परिसरात दरोड्याच्या तयारीत एकत्र आलेल्या टोळक्यावर पोलिसांनी कारवाई करत मोठ्या प्रमाणात शस्त्रसामग्री व साहित्य जप्त केले आहे. या प्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, दिनांक 14 डिसेंबर रोजी पहाटे सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास लातूर–बार्शी मार्गावरील ढोकी पेट्रोल पंप चौकात बार्शीकडे जाणाऱ्या रस्त्यावर दरोडा टाकण्याच्या उद्देशाने काही व्यक्ती एकत्र जमल्याची माहिती ढोकी पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता आरोपी होंडा कार (क्र. एमएच 12 डीसी 9000) मध्ये दरोड्याच्या तयारीसाठी लागणारे साहित्य घेऊन थांबलेले आढळून आले. पोलिसांनी केलेल्या तपासात आरोपींकडून एक लोखंडी कोयता, लोखंडी सत्तूर, दोन हातोडे, वायर कटर, कंपास बॉक्स, लोखंडी पाने, रिंग पाने, लोखंडी पक्कड, व्हील पाना, लोखंडी रॉड, विळा, लाल रंगाची बॅग, मिरची पावडर, काळ्या रंगाची टोपी तसेच लाल-काळ्या रंगाची सुमारे 50 फूट वायर असा एकूण 5 लाख 5 हजार 704 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील आरोपींची नावे अशोक शहाजी शिंदे (वय 40), सुरेश रमन शिंदे (वय 29), विजय शहाजी शिंदे (वय 22), बबीता अनिल पवार (वय 55), नितीन अशोक शिंदे, सचिन अशोक शिंदे (सर्व रा. खामकरवाडी, ता. वाशी, जि. धाराशिव), तसेच ज्ञानेश्वर दत्ता कोळपे (वय 20) व महादेव दत्ता कोळपे (वय 24, दोघे रा. जागजी, ता. व जि. धाराशिव) अशी आहेत. या घटनेबाबत ढोकी पोलीस ठाण्यात नेमणुकीवर असलेले सफौ बापुजी गोपाळराव पुरके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भा.न्या.सं. कलम 310(4), 310(5) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास ढोकी पोलीस करत आहेत.

## रिन्यू पवन चक्की कंपनीच्या वीजतारांवर चढविल्याने तरुणाचा मृत्यू; दोघांविरोधात तक्रार दाखल

आरंभ मराठी । तुळजापूर






रिन्यु पवन चक्की कंपनीच्या वीजतारांमध्ये विद्युत प्रवाह सुरू असल्याची पूर्ण कल्पना असतानाही तरुणास पोलवर चढविल्यामुळे झालेल्या अपघातात एका २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना तुळजापूर तालुक्यातील देवसिंगा (तुळ) येथे घडली आहे. याप्रकरणी विद्याधर तानाजी जाधव व जितेंद्र गुलाब मस्के (दोघे रा. देवसिंगा तुळ, ता. तुळजापूर) हे दोघे जबाबदार असल्याचा आरोप मृत तरुणाच्या बहिणीने केला असून, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मृत तरुणाचे नाव दत्ता हब्बास वाघमारे (वय २५) असे असून, तो मजुरी करून आपला उदरनिर्वाह करत होता.याबाबत त्याची बहीण निकिता अक्षय मस्के (वय २४, रा. भिमनगर, देवसिंगा तुळ) हिने पोलिसांत दिलेल्या जबाबानुसार, दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास विदयाधर जाधव हा त्यांच्या घरी आला. त्याने आपल्या शेतातून रिन्यु कंपनीच्या वीजतारा गेलेल्या असून मोबदला मिळाला नसल्याने त्या तोडण्याचे काम असल्याचे सांगितले.दत्ता हा इलेक्ट्रीशियन नसल्याने व कामाचा अनुभव नसल्याने त्याने प्रथम जाण्यास नकार दिला. मात्र, "तारांमध्ये करंट नाही, तसेच कंपनीची परवानगी घेतलेली आहे," असे खोटे सांगून व हजेरीपोटी पाचशे रुपये देत त्याला सोबत नेण्यात आले, असा आरोप करण्यात आला आहे.यानंतर ग्रामपंचायतीची शिडी लावून रिन्यु पवन चक्की कंपनीच्या पोलवर दत्ता यास चढविण्यात आले. पोलवर चढताच त्याला जोराचा विद्युत धक्का बसून तो खाली कोसळला. गंभीर जखमी अवस्थेत त्यास प्रथम तुळजापूर येथील शासकीय उप जिल्हा रुग्णालयात व नंतर धाराशिव येथील शासकीय जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.वीजप्रवाह सुरू असलेल्या तारांवर कामास लावून तरुणाच्या जीवाशी खेळ करण्यात आल्याचा आरोप नातेवाइकांनी केला असून, संबंधित दोघांविरोधात सदोष मनुष्यवधासह गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे. या घटनेमुळे देवसिंगा तुळ परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत कांबळे हे करीत आहेत.

## राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर; 15 जानेवारीला मतदान




**धाराशिव** :-राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी (दि.15) आयोजित पत्रकार परिषदेत राज्यातील 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा सविस्तर कार्यक्रम जाहीर केला. या निवडणुकांसाठी नामनिर्देशन पत्रे ऑफलाइन पद्धतीनेच स्वीकारली जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. यापूर्वी नगरपालिका निवडणुकांमध्ये ऑनलाईन पद्धतीचा वापर करण्यात आला होता; मात्र त्यात मोठ्या प्रमाणावर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. या महानगरपालिका निवडणुकांमध्ये एकूण 3 कोटी 48 लाख 18 हजार 17 मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जालना आणि इचलकरंजी या दोन ठिकाणी पहिल्यांदाच महानगरपालिकेची निवडणूक होत असून, त्यामुळे त्या शहरांतील नागरिकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे. या निवडणुकांमधून एकूण 2869 नगरसेवक निवडले जाणार आहेत. यामध्ये 1442 जागा महिलांसाठी राखीव असून, अनुसूचित जातींसाठी 341, अनुसूचित जमातींसाठी 77 आणि ओबीसी प्रवर्गासाठी 759 जागांचा समावेश आहे. नगरसेवक पदाच्या निवडणुकीसाठी खर्चाची मर्यादा महानगरपालिकेच्या वर्गवारीनुसार निश्चित करण्यात आली आहे. अ वर्ग महानगरपालिकेसाठी 15 लाख रुपये, ब वर्गासाठी 13 लाख रुपये, क वर्गासाठी 11 लाख रुपये तर ड वर्ग महानगरपालिकेसाठी 9 लाख रुपये इतकी खर्चमर्यादा राहणार आहे. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी खर्चावर काटेकोर नजर ठेवण्यात येणार असल्याचे आयोगाने सांगितले. महानगरपालिका निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता सोमवार दिनांक 15 डिसेंबरपासून लागू करण्यात आली आहे. या कालावधीत कोणत्याही प्रकारची आचारसंहिता भंग करणारी कृती आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. तसेच मतदारांना निर्भय वातावरणात मतदान करता यावे यासाठी आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था आणि प्रशासकीय तयारी करण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले. निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची मुदत 23 ते 30 डिसेंबर 2025 अशी आहे. नामनिर्देशन पत्रांची छाननी 31 डिसेंबर 2025 रोजी होणार असून, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख 2 जानेवारी 2026 आहे. चिन्ह वाटप व अंतिम उमेदवारांची यादी 3 जानेवारी 2026 रोजी जाहीर केली जाणार आहे. प्रत्यक्ष मतदान 15 जानेवारी 2026 रोजी होणार असून, मतमोजणी 16 जानेवारी 2026 रोजी पार पडणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन केले असून, लोकशाहीची ही प्रक्रिया शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## सफला एकादशीनिमित्त हरीनामाच्या गजराने दुमदुमला तेरणा काठ, भाविकांची मोठी गर्दी



**तेर**:- वैराग्य महामेरू संत शिरोमणी संत गोरोबाकाकाच्या मार्गशीर्ष महिन्यातील मासिक वारी असलेल्या सफला एकादशी निमित्ताने हजारो भाविकांनी काकांच्या समाधीचे दर्शन घेतले.यानिमित्ताने हरीनामाच्या गजराने तेरणा काठ दुमदुमुन गेला आहे.१५ डिसेंबर रोजी सफला एकादशीदिवशी काकाच्या समाधीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली.होती दिवसभरात हजारो भाविकांनी दर्शन घेतले.मंदिराच्या परिसरात व बस स्थानक परीसरात भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. धाराशिव-लातूर राज्यमार्गावर वाहनाच्या दुतर्फा रांगा लागलेल्या होत्या.काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती.सांयकाळपर्यंत भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. परिसरातील अनेक गावांतून पायी दिंड्या तेरमध्ये दाखल झाल्या होत्या.भाविकांना सुलभ दर्शन व्हावे, म्हणून संत गोरोबाकाका व शिवमंदिर समितीचे प्रशासक तथा स.धर्मादाय आयुक्त रूपाली कोरे, निरीक्षक अतुल नळणीकर, व्यवस्थापक साहेबराव सौदागर यांनी व्यवस्था केली होती.

आरंभ मराठी

## मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

# विकास प्रकल्पांना मिळणार नागपूर 'आयआयएम'चे मार्गदर्शन

आरंभ मराठी । धाराशिव




महायुती सरकारच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात अनेक महत्वपूर्ण प्रकल्पांना बळ मिळत आहे. जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलून टाकणारे हे प्रकल्प जागतिक दर्ज्याचे व्हावे व त्यांना अधिक गती मिळावी यासाठी आपल्याला व्यवस्थापन क्षेत्रात जगविख्यात असलेल्या नागपूर 'आयआयएम'चे अनमोल मार्गदर्शन मिळणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, तारा व टेक्निकल टेक्सटाईल पार्क हे तीन परिवर्तनकारी प्रकल्प पूर्णत्वाकडे जाण्यासाठी मोठे सहकार्य लाभणार असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव जिल्ह्याचे अर्थकारण सक्षम व गतिमान करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेला तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, कौडगाव येथील टेक्निकल टेक्सटाईल पार्क तसेच १००० एकर चा तारा प्रकल्प या महत्त्वाकांक्षी उपक्रमांना व्यवस्थापन क्षेत्रात नावाजलेल्या नागपूर आयआयएम या जागतिक दर्जाच्या शैक्षणिक व संशोधन संस्थेचे मार्गदर्शन लाभणार आहे. या प्रकल्पांच्या नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंत जागतिक दर्जा, व्यावसायिक दृष्टिकोन, शाश्वत विकास व दीर्घकालीन आर्थिक परिणाम यांचा सखोल अभ्यास करून पुढील दिशा ठरवली जाणार आहे. या अनुषंगाने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नागपूर आयआयएमला भेट देऊन संस्थेच्या तज्ज्ञांशी सविस्तर चर्चा केली. या भेटीत तुळजापूर तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास, भाविकांसाठी मूलभूत सुविधा, पर्यटन पायाभूत सुविधा, स्थानिक व्यवसायांना संधी, तसेच नियोजित टेक्निकल टेक्सटाईल पार्कमुळे निर्माण होणारे औद्योगिक वातावरण, रोजगारनिर्मिती आणि जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारा सकारात्मक परिणाम याबाबत सखोल विचारमंथन करण्यात आले. तारा प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक उद्योजकता, कौशल्यविकास आणि ग्रामीण अर्थकारण मजबूत करण्यावरही भर देण्यात आला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. नागपूर आयआयएमच्या तज्ज्ञांची एक टीम येत्या जानेवारी महिन्यात धाराशिव जिल्ह्याचा दौरा करणार आहे. या दौऱ्यादरम्यान जिल्हा प्रशासन, संबंधित शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी तसेच विविध घटकांशी संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत प्रकल्पांची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी, आर्थिक व्यवहार्यता, गुंतवणूक आकर्षित करण्याच्या शक्यता, सार्वजनिक-खाजगी भागीदारीचे पर्याय आणि प्रभावी व्यवस्थापन यासंबंधी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या तिन्ही प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात थेट व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून पर्यटन, उद्योग, सेवा क्षेत्र आणि स्थानिक व्यवसायांना चालना मिळेल. परिणामी जिल्ह्याच्या उत्पन्नात वाढ होऊन धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण व शाश्वत विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## चोरट्यांनी उमरगा शहरातील सोन्याचे दुकान फोडले; साडेपाच लाखांचे दागिने लंपास

आरंभ मराठी । उमरगा




उमरगा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील श्रीलिला ज्वेलर्स या दुकानात अज्ञात चोरट्यानी मध्यरात्री शटर उचकटून प्रवेश करत मोठी चोरी केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दत्ता विलास पोतदार (वय ३५ वर्षे, रा. माशळकर गल्ली, भिमनगर, उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव) हे श्रीलिला ज्वेलर्स या नावाने व्यवसाय करतात. त्यांच्या दुकानाचे शटर दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे अज्ञात व्यक्तीने उचकटून आत प्रवेश केला. त्यानंतर दुकानातील चांदीचे एकूण ४०८३ ग्रॅम वजनाचे दागिने चोरून नेण्यात आले. चोरी गेलेल्या मालाची अंदाजे किंमत ५ लाख ३१ हजार ०१४ रुपये इतकी असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेची माहिती मिळताच दत्ता पोतदार यांनी १४ डिसेंबर रोजी उमरगा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या प्रथम खबर अहवालावरून उमरगा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (४) व ३०५ (अ) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. चोरीच्या घटनेचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. यावरून पोलिसांचा तपास सुरू आहे. शहरातील मुख्य चौकात असलेल्या ज्वेलर्स दुकानात झालेल्या या चोरीमुळे व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, रात्रीच्या वेळी गस्त वाढवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# तुलना आपल्याला हरवते तेव्हा..

## मना सज्जना

भाग ०७

आपण नकळत आपण स्वतःची तुलना इतरांशी करतो. आणि हाच विचार मनात पहिला काटा बनतो. कोणाचं यश दिसतं. की आपण आपल्या अपयशांची यादी काढतो. इतरांच्या प्रगतीची बातमी आनंद देऊ शकते.

**पण** आपण तिला चिंतेचं कारण बनवतो. तुलना मनावर हळूच ताण टाकते. आणि स्वतःच्या क्षमतेवर सावली टाकते. आपल्याला वाटतं, "मी मागे पडलोय."

पण खरं तर प्रत्येकाची वेळ वेगळी असते. जगातली प्रत्येक वाट वेगळी आहे.

पण आपण सगळ्यांना एका मोजपट्टीत बसवतो. यातून अपुरेपणाची भावना वाढते. आणि आत्मविश्वास कमी होतो.

तुलना नेहमी आपल्याला मागे खेचण्याचे काम करते. आपण स्वतःची मेहनत कधीच पाहत नाही. आपल्या छोट्या प्रगतीलाही महत्त्व देत नाही.


मनाला हे अन्यायकारक वाटतं. आणि मग ते निराशेत बदलतं. तुलना थांबवण्याचा एकच मार्ग आहे. स्वतःच्या मार्गाची जाणीव ठेवणं.

स्वतःच्या गतीचा आदर करणं. इतरांच्या यशाकडे प्रेरणेने पाहणं.

आणि स्वतःबद्दल दयाळूपणे विचार करणं. जीवन ही शर्यत नाही. तो एक वैयक्तिक प्रवास आहे. प्रत्येकाला आपला वेळ लागतो.

**आज स्वतःला एक वाक्य सांगा. "मी माझ्या मार्गावर चालतोय. आणि मला घाई नाही." हे वाक्य मनातील तुलना मऊ करेल. आणि मन पुन्हा हलकं होईल.**

आनंदतनय



## सुभाष वैरागकर यांना 'अभय साधक आणि इतर गोष्टी'साठी मराठा मंदिर साहित्य पुरस्कार




**उमरगः**–उमरगा येथील सहशिक्षक सुभाष वैरागकर यांच्या 'अभय साधक आणि इतर गोष्टी' या बालकथा संग्रहास मराठा मंदिर साहित्य शाखेच्या वतीने देण्यात येणारा साहित्य पुरस्कार २०२४ मधील बालवाङ्मय विभागातील प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम शनिवार, दिनांक १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता मराठा मंदिर, मुंबई सेंट्रल (पूर्व) येथील श्री. जीवाजीराव शिंदे सभागृहात पार पडला. नामवंत शास्त्रज्ञ व साहित्यिक डॉ. गजानन पुरूषोत्तम फोंडके ऊर्फ बाळ फोंडके यांच्या हस्ते श्री. सुभाष वैरागकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी डॉ. बाळ फोंडके यांचे 'विज्ञान आणि मानवी जीवन' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. कार्यक्रमास मराठा मंदिर साहित्य शाखेचे पदाधिकारी तसेच साहित्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालवाङ्मय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सुभाष वैरागकर यांना मिळालेल्या या पुरस्काराचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# जंगल वाचवा' अन्यथा गंभीर परिणाम भोगण्यास तयार रहा!






**बिबट्या** शहरात का येतो, याचा अभ्यास सरकारने कधी केला का? सरकारला आताच शेळ्या का आठवल्या? असे अनेक प्रश्न सध्याच्या परिस्थितीत उपस्थित होत आहेत. सध्या राज्यभरात बिबट्याने मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे. नुकताच नागपूरात दिनांक १० तारखेला बिबट्याने ७ जणांना गंभीररित्या जखमी केले. त्यामुळे बिबट्याचे हल्ले रोखण्यासाठी जंगलात १ कोटी शेळ्या सोडण्याची घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी केली. परंतु प्रश्न निर्माण होतो की, एक कोटी शेळ्या येणार कोठून? आणि आपण कुत्रेच पकडू शकत नाही, तर एक कोटी शेळ्या सोडल्याने सरकारला बिबटे सापडतील असे मला वाटत नाही. आणि सापडले तर ठेवणार कोठे? कारण विधिमंडळ परिसरात रेड कार्पेटवर भटके कुत्रे बिनधास्त फिरत होते. हे कुत्रे पकडण्यासाठी मनपा कर्मचाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतली, पण कुत्रे पकडण्यात अपयश आले. त्यामुळे आपण कुत्रे पकडू शकत नाही, तर बिबटे कसे काय पकडणार, हाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.आपण जंगल संपदा वाढविली असती आणि जंगलतोड रोखली असती, तर आपल्याला गावात किंवा शहरात बिबट्या किंवा हिंसक पशू दिसलेच नसते, हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे बिबट्यासाठी शेळ्यांचा बळी आणि जंगलतोडीमुळे बिबट्याकडून शेतकरी, शेतमजूर, गावातील नागरिक, शहरातील नागरिक, पाळीव प्राणी यांचा बळी हे कितपत योग्य म्हणावे? त्याकरिता सरकारने जंगल वाचविले, तर सर्वांचाच जीव आपोआप वाचेल व सुरक्षित राहील.पर्यावरणप्रेमी, सामाजिक संघटना, गावकरी, राज्यातील नागरिक आणि स्वतः निसर्ग जंगलतोडीचा कडाडून विरोध करीत आहेत. तरीही विकासाच्या नावावर किंवा धार्मिकतेच्या नावावर मोठ्या प्रमाणात जंगलतोड व वृक्षांची कत्तल सुरूच आहे. आणि हे संपूर्ण दृश्य सरकार, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. तरीही जंगलतोड अजूनपर्यंत थांबलेली नाही.बिबट्या शहरात किंवा गावात धाव का घेत आहेत याची कल्पना सरकारला आहे, तरी शहरीकरण, औद्योगिकीकरण, धार्मिकतेच्या नावावर मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढत आहे. आज राज्यातीलच नाही, तर देशातील प्रत्येक शहरांचा विचार केला, तर प्रत्येक शहराच्या मुख्य पॉईंट्सपासून ४० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण व औद्योगिकीकरण झालेले आहे. आपण आपल्या सुखसुविधांसाठी जंगल तोडून शहरीकरण केले, हे ठीक आहे. परंतु बिबट्या किंवा इतर प्राण्यांचा विचार सरकारने कधी केला का? की त्यांचे काय होईल? या मुक्या पशुपक्ष्यांना कोण अन्नपाणी देईल, याचा विचार राज्यातील कोणत्याही सरकारने केलाच नाही.त्याचेच प्रायश्चित्त म्हणजे आज बिबट्यांनी राज्यातील प्रत्येक शहरांमध्ये व गावांमध्ये धुमाकूळ घातला आहे. आज बिबट्या आपल्या अन्नासाठी शहरात येतो आणि सरकारला खडबडून जाग येते, आणि सरकार म्हणते की बिबट्यांचा शहरातील हैदोस पाहता त्यांच्या खाद्यपुरवठ्यासाठी एक कोटी शेळ्या जंगलात सोडू. अहो, तुम्ही वरच्यावर जंगल कापत राहाल, तर शेळ्या कुठे सोडणार? आपण जर शेळ्या जंगलात सोडत असाल, तर ही तर पाळीव प्राण्यांची हत्याच म्हणावी लागेल. आता शहरीकरण थांबायला तयार नाही, त्यामुळे सरकारने बिबट्यांना पाळीव प्राण्यांचा दर्जा दिला तर बरे होईल. कारण शेळ्या जंगलात सोडण्यापेक्षा आम्ही घरीच त्यांना जेवण देऊ शकतो. सरकारने सर्वच गोष्टींचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण देशासह राज्यात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे, बिबट्यांची संख्या वाढत आहे, कुत्र्यांची संख्या वाढत आहे. यावर ठोस पाऊल उचलणे गरजेचे आहे.सरकारने जर जंगल वाचविले, तर बिबट्या किंवा अन्य हिंसक पशूंना शेळ्यांची सुद्धा गरज भासणार नाही. सरकार चुकीचा अंदाज लावत आहे की बिबट्या शहरात किंवा गावात येतो. परंतु तसे अजिबात नाही, कारण बिबट्या किंवा अन्य पशुपक्षी यांच्या घरांवर आपणच, म्हणजे मानवजातीने व मुख्यत्वे करून सरकारने अतिक्रमण केले आहे. म्हणूनच बिबट्यासारखे अनेक हिंसक पशू शहराकडे किंवा गावाकडे धाव घेताना दिसतात आणि यामुळे जीवितहानीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.यात बिबट्याचा काय दोष? बिबट्या हा आपली खाद्यपूर्तीसाठी शहरात येत आहे, म्हणून काय त्यांच्या खाद्यपूर्तीसाठी आपण शेळ्यांचा वापर करणार काय? म्हणजे एकाचा जीव वाचवण्यासाठी दुसऱ्याचा जीव घ्यायचा, हा कुठला न्याय? ही हत्याच म्हणावी लागेल! त्यापेक्षा सरकारने जंगलतोड व वृक्षतोड थांबविली, तर बिबट्यांचेही प्राण वाचतील आणि शेळ्यांचाही जीव वाचेल.सरकार साधुग्रामसाठी तपोवनातील १८०० झाडांची हत्या करण्याच्या तयारीत आहे. याचा पुढे नाशिककरांसाठी काय विपरीत परिणाम होईल, हे आज राज्यातील अनेक भागांत बिबट्या दाखवून देत आहे. त्यामुळे बिबट्यांची वाढती संख्या, जंगलतोड आणि बिबट्यांच्या खाद्यपूर्तीसाठी शेळ्यांची पेशकश हे कितपत योग्य आहे, याचा सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे आणि संपूर्ण हिंसक पशू वास्तव जंगलात कसे राहतील, याचा अभ्यासपूर्वक विचार सरकारने केला पाहिजे. कारण गेल्या काही वर्षांपासून बिबट्या शहरात व गावात येत आहे. याचेच प्रायश्चित्त म्हणून जंगलतोडीमुळे शेतकरी, गुराखी, पाळीव प्राणी यांची आतापर्यंत मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली आहे. सरकारने विचार करायला हवा की, मोजक्या बिबट्यांसाठी एक कोटी शेळ्यांची हत्या करायची, हे कितपत योग्य म्हणावे.आपण वनसंरक्षण कायद्यानुसार जंगली पशूंना मारू शकत नाही. परंतु बिबट्यांचा शहरात व गावांतील वाढता हैदोस पाहता सर्वसामान्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व वनविभागाने स्वीकारली पाहिजे. कारण कायदे बनविणारे सरकारच आहे. त्यामुळे सरकारने मानव, बिबट्या आणि शेळ्या यांना वाचविण्याची जबाबदारी स्वीकारावी. फक्त तोंडी आश्वासन देऊन चालणार नाही, तर ठोस उपाययोजना केली पाहिजे.आपण कायद्यानुसार बिबट्यांना मारूही शकत नाही. त्यामुळे यावर सरकारजवळ एकच उपाय आहे, तो म्हणजे जंगल वाचविणे. बिबट्यांना शेळ्या खाऊ घाला किंवा आणखी काही खाऊ घाला, जोपर्यंत जंगलतोड थांबणार नाही, तोपर्यंत हिंसक पशूंचे आक्रमण सुरूच राहील. सावधान! भिवापूर तालुक्यात वाघांचा मुक्त संचार सुरू असल्याचे गावकरी, शेतमजूर, गुराखी, सामान्य नागरिक सांगत आहेत. याकडे वनविभाग दुर्लक्ष करीत आहे, असा भिवापूरवासीयांचा आरोप सुद्धा आहे. या गंभीर समस्येकडे भिवापूर तालुक्यातील खरेदी-विक्री संघाने वनमंत्री गणेश नाईक यांना निवेदन सुद्धा दिले आहे. यावरून स्पष्ट होते की हिंसक पशूंचा मुक्त संचार राज्यातील अनेक भागांत, जिल्ह्यांत, गावखेड्यांत, शहरांत सुरूच आहे. परंतु यावर वनविभागाने अजूनपर्यंत ठोस उपाययोजना केल्याचे दिसत नाही.हल्लेखोर प्राणी आता सरकारला सल्ला देत आहेत की, आताही जंगल वाचवा. त्यामुळे वनविभाग व सरकारला आग्रहाची विनंती आहे की, आपल्याला हिंसक पशूं पासून जर सुरक्षित राहायचे असेल, तर प्रथम जंगल संपदा वाढविली पाहिजे. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो. नं. : ९९२१६९०७७९, नागपूर

# डिजिटल युगातील कामगाराचे स्वातंत्र्य: 'राईट टू डिस्कनेक्ट' विधेयक २०२५ चा समाजशास्त्रीय मागोवा

**आजचे** जग झपाट्याने बदलत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने माणसाचे जीवन अधिक सुलभ, वेगवान आणि जोडलेले गेले आहे; परंतु याच तंत्रज्ञानाने काम आणि खासगी आयुष्य यांमधील सीमारेषा पुसट केली आहे. मोबाइल फोन, लॅपटॉप, ई-मेल, व्हॉट्सअॅप, व्हिडीओ कॉल, ऑनलाईन प्लॅटफॉर्म यांमुळे कामाची वेळ आता ठराविक कार्यालयीन तासांपुरती मर्यादित राहिलेली नाही. कार्यालय बंद झाले तरी काम मनातून सुटत नाही, सुट्टी असली तरी 'ऑनलाईन' राहण्याचा दबाव कायम असतो. याच पार्श्वभूमीवर 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल २०२५ हे विधेयक अत्यंत महत्त्वाचे ठरते. हे विधेयक म्हणजे केवळ कर्मचाऱ्यांचा एक नवीन हक्क नाही, तर आधुनिक समाजाच्या कामकाज संस्कृतीवर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित करणारा सामाजिक दस्तऐवज आहे 'राईट टू डिस्कनेक्ट' या संकल्पनेचा अर्थ साधा आहे की कामाचे ठराविक तास संपल्यानंतर कर्मचारी किंवा कामगार यांना कार्यालयीन ई-मेल, फोन कॉल, मेसेज, ऑनलाईन मीटिंग किंवा तत्सम डिजिटल संपर्कांपासून दूर राहण्याचा अधिकार असावा. म्हणजेच, कामाच्या वेळेनंतर कर्मचारी 'ऑफलाइन' राहू शकतो आणि त्यासाठी त्याच्यावर कोणताही अप्रत्यक्ष दबाव, शिक्षा किंवा नकारात्मक मूल्यांकन होऊ नये. आजच्या काळात अनेक कर्मचारी शारीरिकदृष्ट्या कार्यालयाबाहेर असतात, पण मानसिकदृष्ट्या सतत कामाशी जोडलेले असतात. हा सततचा मानसिक ताण, उपलब्ध राहण्याची अपेक्षा आणि तत्काळ प्रतिसाद देण्याची सक्ती हळूहळू व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर, कौटुंबिक जीवनावर आणि सामाजिक नातेसंबंधांवर गंभीर परिणाम करते. त्यामुळे 'राईट टू डिस्कनेक्ट' ही केवळ कामगार कायद्याची तरतूद नसून मानसिक आरोग्य, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक संतुलनाशी जोडलेली मागणी आहे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास कामाचे स्वरूप हे नेहमीच सामाजिक रचनेशी जोडलेले राहिले आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कामाची वेळ, कारखान्याचे तास, कामगारांचे श्रम हे स्पष्टपणे ठरवले गेले. पुढे कार्यालयीन संस्कृती आली तेव्हा 'नऊ ते पाच' ही वेळ समाजमान्य झाली. पण डिजिटल युगात ही चौकट मोडली आहे. 'वर्क फ्रॉम होम', 'हायब्रिड वर्क', 'फ्रीलान्सिंग', 'गिग इकॉनॉमी' यांसारख्या संकल्पनांनी काम अधिक लवचिक केले असले, तरी त्याच वेळी कामगारांचे संरक्षण कमकुवत झाले आहे. कर्मचारी कधीही, कुठूनही काम करू शकतो, ही सुविधा जितकी आकर्षक आहे, तितकीच ती शोषणाची शक्यता वाढवणारी आहे. कारण कामाची वेळ ठरलेली नसल्यामुळे कामगार कायम उपलब्ध राहील, अशी अपेक्षा निर्माण होते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल या बदलत्या कामसंस्कृतीत कामगारांचे हक्क पुन्हा ठोसपणे अधोरेखित करते या विधेयकाचा मुख्य उद्देश म्हणजे काम आणि वैयक्तिक आयुष्य यांमधील संतुलन पुन्हा प्रस्थापित करणे. आधुनिक समाजात व्यक्तीची ओळख केवळ तिच्या कामगिरीवर ठरवली जात आहे. कामाच्या बाहेरचे आयुष्य कुटुंब, विश्रांती, आरोग्य, सामाजिक सहभाग या गोष्टी दुय्यम ठरत चालल्या आहेत. समाजशास्त्र सांगते की जेव्हा व्यक्तीचे सामाजिक आयुष्य आकुंचन पावते, तेव्हा समाजात तणाव, नैराश्य, एकटेपणा आणि मानसिक आजार वाढतात. 'राईट टू डिस्कनेक्ट' हा हक्क व्यक्तीला तिचे आयुष्य केवळ कामापुरते मर्यादित न ठेवता पूर्ण मानव म्हणून जगण्याची मुभा देतो. काम हे जीवनाचा एक भाग आहे, संपूर्ण जीवन नाही हा संदेश या विधेयकातून अधोरेखित होतो. या विधेयकात कामगार आणि नियोक्ता यांच्यातील नातेसंबंध नव्या पद्धतीने मांडलेले दिसतात. पारंपरिक अर्थाने नियोक्ता म्हणजे आदेश देणारा आणि कर्मचारी म्हणजे त्याचे पालन करणारा, अशी श्रेणीबद्ध रचना होती. परंतु आधुनिक लोकशाही समाजात कामगारांचे हक्क, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता मान्य केली जाते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल नियोक्त्यांनाही जबाबदार बनवते. कामाचे तास, आपत्कालीन परिस्थिती, डिजिटल संवादाचे नियम, कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीचा कालावधी या सर्व बाबी स्पष्टपणे ठरवण्याची अपेक्षा या विधेयकातून व्यक्त होते. त्यामुळे कामाचे नियोजन अधिक शिस्तबद्ध आणि मानवीकेंद्रित होण्याची शक्यता निर्माण होते महिलांच्या दृष्टीने या विधेयकाचे महत्त्व अधिक आहे. भारतीय समाजात महिलांवर घरकाम, मुलांची जबाबदारी, वृद्धांची काळजी आणि नोकरी असा दुहेरी किंवा तिहेरी भार असतो. 'वर्क फ्रॉम होम'च्या काळात अनेक महिलांना कार्यालयीन काम आणि घरगुती जबाबदाऱ्या एकाच वेळी सांभाळाव्या लागल्या आहेत. कामाची ठराविक वेळ नसल्यामुळे महिलांच्या विश्रांतीचा वेळ जवळजवळ नाहीसा झाला. 'राईट टू डिस्कनेक्ट' हक्क महिलांना मानसिक मोकळीक देऊ शकतो, कारण तो कामाच्या अपेक्षा मर्यादित करतो आणि वैयक्तिक वेळेचा सन्मान करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या हा हक्क लिंगसमतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो तरुण पिढीसाठीही हे विधेयक तितकेच महत्त्वाचे आहे. आजची तरुणाई स्पर्धात्मक वातावरणात काम करत आहे. सतत 'ऑनलाईन' राहणे, तत्काळ प्रतिसाद देणे, जास्त वेळ काम करणे हेच यशाचे मोजमाप बनले आहे. या दबावामुळे बर्नआउट, चिंता, नैराश्य, झोपेचे विकार यांचे प्रमाण वाढत आहे. समाजशास्त्रात याला 'डिजिटल थकवा' असे म्हटले जाते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल तरुण पिढीला हे शिकवते की स्वतःची काळजी घेणे, विश्रांती घेणे आणि कामापासून दूर राहणे हे कमजोरी नाही, तर निरोगी जीवनाचे लक्षण आहे. या विधेयकाचा प्रभाव केवळ वैयक्तिक पातळीवर मर्यादित राहत नाही, तर तो संपूर्ण समाजावर परिणाम करतो. जेव्हा कर्मचारी मानसिकदृष्ट्या तणावमुक्त असतो, तेव्हा तो अधिक सर्जनशील, उत्पादक आणि समाधानी असतो. याचा फायदा उद्योगांनाही होतो. कामगारांचे आरोग्य बिघडले, तर उत्पादकता घटते, अनुपस्थिती वाढते आणि सामाजिक आरोग्यव्यवस्थेवर ताण येतो. त्यामुळे 'राईट टू डिस्कनेक्ट' हा हक्क अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही दीर्घकालीनदृष्ट्या फायदेशीर ठरू शकतो.समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिल्यास हे विधेयक आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेतील अति-उत्पादन आणि अति-काम या प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. सतत काम, सतत उपलब्धता आणि कार्यक्षमतेची अतिरेकी अपेक्षा ही माणसाला यंत्रासारखे वागवते. 'राईट टू डिस्कनेक्ट' ही संकल्पना माणूस केंद्रस्थानी ठेवणाऱ्या विकासाच्या विचाराशी जोडलेली आहे. विकास म्हणजे केवळ आर्थिक आकडे नव्हेत, तर मानवी सुख, आरोग्य आणि सामाजिक नातेसंबंध यांचाही समावेश असावा, ही भूमिका या विधेयकातून अधोरेखित होते.वर्तमानपत्राच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत या विधेयकाची माहिती पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अनेक कर्मचारी अजूनही हे मान्य करत नाहीत की कामाच्या वेळेनंतर 'नाही' म्हणणे हा त्यांचा हक्क आहे. समाजात ही जाणीव निर्माण झाली, तर कामसंस्कृतीत बदल घडू शकतो. कार्यालयीन ई-मेलला तात्काळ उत्तर देणे ही निष्ठा नसून, विश्रांतीचा सन्मान करणे ही खरी जबाबदारी आहे, असा दृष्टिकोन विकसित होणे गरजेचे आहे. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल हा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.शेवटी असे म्हणता येईल की 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल २०२५ हे केवळ कायदेशीर तरतुदींचे संकलन नाही, तर आधुनिक समाजाला आरसा दाखवणारे विधेयक आहे. ते आपल्याला विचारायला भाग पाडते. आपण कामासाठी जगतो आहोत की जगण्यासाठी काम करतो आहोत? काम आणि आयुष्य यांच्यातील सीमारेषा पुन्हा स्पष्ट करणे, मानवी प्रतिष्ठेला प्राधान्य देणे आणि तंत्रज्ञानावर माणसाचे नियंत्रण प्रस्थापित करणे हा या विधेयकाचा गाभा आहे. समाजाने, उद्योगांनी आणि शासनाने मिळून हा विचार स्वीकारला, तरच 'राईट टू डिस्कनेक्ट' हा केवळ कायद्यातील शब्द न राहता प्रत्यक्ष जीवनातील अनुभव बनेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) केवळ संदेशाशाठी मो. क्र. ९९६०९०३५८२, ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

## भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा उपक्रमात सहभाग घेण्यासाठी नोंदणी सुरू

**आरंभ मराठी । धाराशिव**

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने राज्यात संविधान अमृत महोत्सवी जागृती अभियानांतर्गत भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा–२०२५ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाबाबतच्या सविस्तर सूचना शासनस्तरावरून देण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांच्या अध्यक्षतेखाली १२ डिसेंबर २०२५ रोजी सामाजिक न्याय भवन,नागपूर येथे बैठक पार पडली.

भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा–२०२५ मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यासाठी www.yuvacareer.com ही वेबसाईट सुरू करण्यात आली आहे. या वेबसाईटवर अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवायचा आहे.यामध्ये विविध प्रशिक्षण संस्था,अधीक्षक वसतिगृहे, तंत्रनिकेतन, अल्पसंख्याक शाळा, मदरसे इत्यादींचा समावेश आहे.या पोर्टलवर दिनांक १० डिसेंबरपासून नोंदणी सुरू झाली असून दिनांक ३१ डिसेंबरपर्यंत विद्यार्थ्यांना नोंदणी करता येणार आहे. www.yuvacareer.com या वेबसाईटवर नोंदणी केल्यानंतर त्याचा अहवाल जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

# तुळजापूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनाच नाही वेळेचे भान

## अभ्यागतांना दुपारपर्यंत ताटकळत ठेवण्याचा प्रकार ; ग्रामीण भागातील कामे खोळंबली

**गणेश गायकवाड । आरंभ मराठी**

तामलवाडी - ग्रामीण विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या पंचायत समिती कार्यालयातील शिस्त व कार्यतत्परतेबाबत नेहमीच कर्मचाऱ्यांना जाब विचारणारे गटविकास अधिकारीच जर वेळेचे भान ठेवत नसतील, तर सामान्य नागरिकांनी न्यायाची अपेक्षा कुणाकडून करावी, असा संतप्त सवाल सध्या तुळजापूर तालुक्यातील जनता उपस्थित करत आहे. तुळजापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आठवड्याच्या पहिल्याच दिवशी, सोमवार दि. 15 डिसेंबर रोजी तब्बल दुपारी दोन वाजता कार्यालयात दाखल झाल्याने सकाळपासून त्यांची भेट घेण्यासाठी आलेल्या नागरिकांना व लोकप्रतिनिधींना अक्षरशः चार तास ताटकळत बसावे लागले. सकाळपासून नागरिकांची पंचायत समिती कार्यालयात गर्दी होती मात्र, अधिकारी बेपत्ता असल्याचे दिसून आले. घरकुल योजना, मनरेगा, पाणीपुरवठा, स्वच्छता अभियान, ग्रामविकास कामे तसेच विविध तक्रारी घेऊन तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, सरपंच, ग्रामसेवक व सामान्य नागरिक सकाळीच पंचायत समिती कार्यालयात दाखल झाले होते. मात्र गटविकास अधिकारी कार्यालयात अनुपस्थित असल्याने नागरिकांची कामे खोळंबली होती. विशेष म्हणजे, पंचायत समितीतील कर्मचाऱ्यांना उशिरा येणे, अनुपस्थिती, कामातील दिरंगाई यावर वारंवार कारवाईचा इशारा देणारे गटविकास अधिकारी स्वतःच कार्यालयीन वेळेचे पालन करत नसल्याचे यामुळे स्पष्ट झाले आहे. 'लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपणच कोरडे पाषाण' या म्हणीचा प्रत्यय येणारी ही घटना असल्याची चर्चा कर्मचारी व नागरिकांमध्ये सुरू झाली. गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा प्रमुख अधिकारी असतो. त्यांच्या अनुपस्थितीमुळे निर्णय रखडतात, कामांना मंजुरी मिळत नाही आणि ग्रामपंचायतींच्या विकास कामांवर थेट परिणाम होतो. अशा प्रकारे वारंवार उशिरा येणे किंवा कार्यालयात अनुपस्थित राहणे हे ग्रामीण विकासाच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. या प्रकाराबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन कार्यालयीन शिस्त लावावी, अशी मागणी नागरिक व लोकप्रतिनिधींमधून होत आहे. अन्यथा पंचायत समिती कार्यालय म्हणजे केवळ ताटकळण्याचे ठिकाण ठरेल, अशी तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.



### बायोमॅट्रिक हजेरी बनली शोभेची वस्तू

पंचायत समिती कार्यालयात शिस्त आणि वेळपालनासाठी बसविण्यात आलेली बायोमॅट्रिक हजेरी प्रणाली केवळ शोभेपुरतीच उरल्याचे चित्र आहे. ही यंत्रणा धूळ खात पडली असून कर्मचारी याचा वापर करतात की नाही याची शंका निर्माण झाली आहे. गटविकास अधिकारी वेळेवर येत नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना तासनतास ताटकळत बसावे लागत आहे. ही गंभीर बाब असून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

## विविध वृत्त...

### सेवानगरला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा; ग्रामस्थांचा जल्लोष



**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा तालुक्यातील कदेर ग्रामपंचायतीच्या महसुली हद्दीत समाविष्ट असलेल्या सेवानगर, सरदार नगर व व्यंकटेश नगर या तीन बंजारा तांड्यांसाठी 'सेवानगर' या नावाने स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा राज्य शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयाने राजपत्राद्वारे जाहीर केला आहे. या निर्णयामुळे कदेर ग्रुप ग्रामपंचायतीपासून सेवानगर विभक्त झाला असून ग्रामस्थांनी फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा केला. कदेर ग्रामपंचायतीच्या हद्दीत सेवानगर, सरदार नगर व व्यंकटेश नगर हे तीन स्वतंत्र तांडे समाविष्ट होते. ही तांडे मुख्य ग्रामपंचायतीपासून लांब अंतरावर असल्याने प्रशासकीय व विकासात्मक अडचणी येत होत्या. दिवंगत भगवान जाधव यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे सेवानगरला सन २०१९ मध्ये महसुली दर्जा प्राप्त झाला होता. त्यानंतर विकास भगवान जाधव यांनी स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळवण्यासाठी सलग पाच वर्षे पाठपुरावा केला. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभागाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्याकडे करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश आले. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार कदेर व सेवानगर ही दोन गावे २५ नोव्हेंबरपासून स्वतंत्र करण्यात आल्याची अधिसूचना शासनाचे उपसचिव क. पोदार यांनी काढली आहे. दरम्यान, कदेर ग्रामपंचायतीचा पंचवार्षिक कालावधी १० फेब्रुवारी २०२६ रोजी संपत असल्याने कदेरबरोबरच नव्याने स्थापन झालेल्या सेवानगर ग्रामपंचायतीसाठीही स्वतंत्र निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाल्याने परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

### ई-रोल मॅपिंग व आगामी SIR कार्यक्रमाच्या तयारीसाठी BLO ना मार्गदर्शन




**आरंभ मराठी । धाराशिव**

सोमवारी (दि.१५) धाराशिव येथील जिल्हा परिषद सभागृह येथे सन २०२४ मधील मतदार यादीचे ई-रोल मॅपिंग तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. तहसील कार्यालयाच्या वतीने झालेल्या या बैठकीस २४१-तुळजापूर व २४२-धाराशिव (उस्मानाबाद) विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) व त्यांचे पर्यवेक्षक उपस्थित होते. या बैठकीत नागले, मल्लिनाथ जमादार, किशोर वंजारवाडकर, दत्तात्रय मस्के व प्रशांत भोवळ यांनी ई-रोल मॅपिंग प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. सन २००२ च्या मतदार यादीच्या अनुषंगाने येत्या महिन्याच्या अखेरीस किंवा जानेवारी २०२६ मध्ये विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले. मतदार यादीची अचूकता राखण्यासाठी BLO ॲपद्वारे 'Mapping of electors with previous SIR' ही प्रक्रिया काळजीपूर्वक पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. काम वेळेत व अचूक न झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला.

### महाराष्ट्र पोलीस मित्र समितीच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी नवनाथ यादव

**आरंभ मराठी । भूम**



भूम तालुक्यातील आष्टा येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार नवनाथ गोरख यादव यांची महाराष्ट्र पोलीस मित्र समितीच्या धाराशिव जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. दिनांक १५ डिसेंबर रोजी ही निवड जाहीर करण्यात आली असून, महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र समितीचे राज्याध्यक्ष किरण गायकवाड यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले. पोलीस प्रशासन व नागरिक यांच्यातील विश्वास अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या पोलीस मित्र समितीच्या माध्यमातून जिल्हा, तालुका व गाव पातळीवर मोठ्या प्रमाणात पोलीस मित्रांची नेमणूक करून समाजहितासाठी प्रभावी कार्य केले जाईल, असा विश्वास नवनाथ यादव यांनी व्यक्त केला.

### काटी येथील किसन हंगरगेकर यांचे निधन

**आरंभ मराठी । तुळजापूर**



तुळजापूर तालुक्यातील काटी येथील जेष्ठ नागरिक किसन शंकरराव हंगरगेकर (वय 70) यांचे रविवारी (दि.14) सायंकाळी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुजित हंगरगेकर यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी काटी येथील हिंदू स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना,नातवंडे, तीन भाऊ, तीन बहिणी, भावजय, जावाई असा परिवार आहे.

## कुंभेफळ ग्रामपंचायतीत पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीचा कथित गैरवापर; चौकशीला विलंब, कारवाई कधी?

**आरंभ मराठी । परंडा**




परंडा तालुक्यातील कुंभेफळ येथील ग्रामपंचायतीमध्ये पंधराव्या वित्त आयोग योजनेअंतर्गत मिळालेल्या निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. कागदोपत्री खर्च दाखवलेल्या कामांचा प्रत्यक्षात कुठलाही ठावठिकाणा नसल्याने सार्वजनिक निधीच्या गैरवापराचा संशय अधिकच बळावला आहे. याप्रकरणी ग्रामस्थ किशोर गायकवाड यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती परंडा यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असूनही अद्याप ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तक्रारीनुसार, ग्रामपंचायतीकडील १ ते ३३ नमुने उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. तसेच ग्रामपंचायतीच्या सर्व बँक खातेपुस्तिकांची माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अंगणवाडीच्या नावाखाली कोणतेही प्रत्यक्ष काम न करता बिले काढण्यात आल्याचाही गंभीर आरोप तक्रारीत नमूद करण्यात आला आहे. गटविकास अधिकारी परंडा यांच्या मार्फत प्राप्त माहितीनुसार, दिनांक १७ एप्रिल २०२३ रोजी पंधराव्या वित्त आयोगातून अंगणवाडी साहित्य खरेदीसाठी रुपये ३० हजार ७०० खर्च दाखवण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या ठिकाणी कोणतेही साहित्य अथवा संबंधित काम अस्तित्वात नसल्याचे स्पष्ट झाले आहे. याशिवाय पाणीपुरवठा योजनेअंतर्गत विहिरीजवळील बोअरमधील मोटार काढून ती मारुती मंदिराजवळील बोअरमध्ये बसवण्यात आल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आले आहे. या कामासाठी रुपये ३७ हजार ५०० खर्च झाल्याची नोंद आहे. प्रत्यक्षात मात्र त्या ठिकाणी मोटार, पाइपलाइन अथवा कोणतेही काम आढळून आलेले नाही. अंगणवाडी आणि पाणीपुरवठा या दोन्ही कामांसाठी एकूण रुपये ६८ हजार २०० खर्च झाल्याचे दाखवण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात एकही काम झाल्याचे दिसून येत नाही. हा प्रकार अत्यंत गंभीर असून, संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देऊन केव्हा कारवाई करणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

## डॉ. विक्रमसिंह माने यांना 'हायर एज्युकेशन लीडर ऑफ द इयर-२०२५' पुरस्कार

**आरंभ मराठी । धाराशिव**



तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांना १२ डिसेंबर २०२५ रोजी पुणे येथील फेअरफील्ड बाय मॅरियट येथे आयोजित सिम्पलीलर्न युनिव्हर्सिटी लीडर्स फोरममध्ये 'हायर एज्युकेशन लीडर ऑफ द इयर–२०२५' या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उद्योग आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील दरी कमी करण्यासाठी कौशल्यविकास, पुनर्कौशल्य आणि दर्जेदार शिक्षणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल या पुरस्कारातून घेण्यात आली आहे. डॉ. माने यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात प्रशिक्षण व प्लेसमेंट उपक्रमांना गती मिळाली असून विविध नामांकित कंपन्यांच्या सहकार्याने हजारो विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक व सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञान, ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, औद्योगिक कार्यशाळा आणि संशोधनाभिमुख शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता तसेच रोजगारक्षमता वाढली आहे. या सन्मानाबद्दल तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील, विश्वस्त, व्यवस्थापन, प्राध्यापक, कर्मचारी, उद्योजक तसेच आजी-माजी विद्यार्थ्यांकडून डॉ. विक्रमसिंह माने यांचे अभिनंदन होत आहे.

## नवनियुक्त भाजपा पदाधिकाऱ्यांचा माजी आमदार ठाकूर यांच्या हस्ते सत्कार



**आरंभ मराठी । परंडा**

भाजपा नेते आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते भाजपा संपर्क कार्यालय, परंडा येथे नवनिर्वाचित भारतीय जनता पार्टी परंडा तालुक्यातील विविध मोर्चा व आघाडीच्या तालुकाध्यक्षांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या निवडी तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे यांनी जाहीर केल्या असून भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष अजित धन्यकुमार काकडे (दहिटणा), महिला मोर्चा तालुकाध्यक्षा प्रियंका निशीकांत क्षिरसागर (आनाळा), किसान मोर्चा अध्यक्ष अर्जुन दत्तात्रय कोलते (रोहकल), ओबीसी मोर्चा अध्यक्ष तुकाराम बिरमल हजारे (कौडगाव), अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष संतोष मधुकर शिंदे (वाटेफळ), अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष फारूख बाशामिया मुलाणी (आलेश्वर), विधी आघाडी अध्यक्ष ॲड. लक्ष्मण सदाशिव कोकाटे (कुंभेजा), भटके विमुक्त आघाडी अध्यक्ष राहुल आप्पासाहेब खोत (ताकमोडवाडी), उद्योग आघाडी अध्यक्ष नागेश सुनिल गर्जे (सोनारी), दिव्यांग आघाडी अध्यक्ष तानाजी दत्तात्रय घोडके तसेच सोशल मीडिया अध्यक्ष तुषार सिद्धेश्वर नेटके (भोंजा) यांची निवड करण्यात आली आहे. या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. नवनियुक्त पदाधिकारी व इतर मान्यवर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त कानेगाव जिल्हा परिषद गटात 'सुप्रिया शेतकरी संवाद दौऱ्या'ची सुरुवात

**आरंभ मराठी । लोहारा**




देशाचे माजी कृषीमंत्री पद्मविभूषण शरद पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कानेगाव जिल्हा परिषद मतदारसंघात 'सुप्रिया शेतकरी संवाद दौऱ्या'चे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक 12 डिसेंबर रोजी या संवाद दौऱ्याची सुरुवात भातागळी (ता. लोहारा) येथून करण्यात आली. शरद पवार यांच्यावर अजन्म प्रेम करणाऱ्या पाच शेतकरी बांधवांच्या हस्ते उद्घाटन करून एक वेगळी प्रथा आणि परंपरा जोपासण्यात आल्याची माहिती शेतकरी नेते अनिल जगताप यांनी दिली. सुप्रिया शेतकरी संवाद दौऱ्याच्या माध्यमातून सन 2020 ते 2025 या कालावधीतील पिक विमा, अतिवृष्टी अनुदान, कांदा अनुदान, प्रोत्साहन अनुदान, दूध अनुदान तसेच शासनाकडील इतर देणी आणि शासकीय योजनांबाबत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करण्यात येणार आहे. यासाठी शेतकरी बांधवांकडून अर्ज भरून घेऊन शासन स्तरावर पाठपुरावा करून संबंधित प्रश्न मार्गी लावले जातील, असे अनिल जगताप यांनी सांगितले. कानेगाव जिल्हा परिषद मतदारसंघातील आरणी, कानेगाव, भातागळी, काष्टी खुर्द, काष्टी बुद्रुक, नागूर, लोहारा खुर्द, मोगा खुर्द, मोगा बुद्रुक, शिवकरवाडी, बेलवाडी, नागराळ, बेंड काळ, उंडरगाव, मार्डी आणि हिप्परगा रवा या गावांमध्ये सुप्रिया शेतकरी संवाद दौरा होणार आहे. भातागळी गावात बालाजी आनंदगावकर, चंद्रकांत पवार, लक्ष्मण चव्हाण, हनुमंत दादा जगताप, दत्तात्रय मिसाळ आणि सरपंच हनुमंत भानुदास जगताप यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कोणत्याही राजकीय व्यक्तीला न बोलावता गावातील शेतकऱ्यांच्या हस्तेच उद्घाटन केल्याने तालुक्यात याची चर्चा झाली असून बळीराजाला सन्मान दिल्याबद्दल शेतकरी वर्गात समाधान व्यक्त होत आहे. हा कार्यक्रम शेतकरी नेते अनिल जगताप यांच्या संकल्पनेतून साकार होत असून भातागळी येथील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश जगताप, शुभम जगताप, अभिषेक जगताप, गणेश फत्तेपुरे, वैभव जगताप, गोविंद जगताप, संकेत जगताप, मुकुंद चव्हाण, महादेव आनंदगावकर, दयानंद मिसाळ, दादा चव्हाण आदी शेतकऱ्यांनी परिश्रम घेतले. पुढील आठवड्यात कानेगाव जिल्हा परिषद मतदारसंघातील प्रत्येक गावात हा संवाद दौरा होणार असून जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात लोहारा येथे जाहीर सभेने या दौऱ्याचा समारोप करण्यात येणार आहे. या सभेसाठी संसद रत्न खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार अमोल कोल्हे यांना आमंत्रित करण्याचा मानस असल्याचे संयोजक अनिल जगताप यांनी सांगितले.

**आरंभ मराठी** — आतापर्यंत ६९ बोगस डॉक्टरांवर कारवाई,विविध पोलिस ठाण्यात तपास सुरू

## बोगस डॉक्टरांचे धाबे दणाणले; कडक कारवाईचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**आरंभ मराठी । धाराशिव**



जिल्ह्यात रुग्णसंख्येत वाढ होत असतानाच काही बोगस डॉक्टरांनी अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय सुरू केल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, अशा बनावट डॉक्टरांचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार आहे. भविष्यात कोणीही अशा प्रकारचा व्यवसाय करण्याचे धाडस करणार नाही, असा कायमस्वरूपी धडा देण्यासाठी आरोग्य विभागाने ठोस पावले उचलावीत, असे सक्त निर्देश जिल्हाधिकारी तथा अनधिकृत वैद्यकीय व्यवसायिक (बोगस डॉक्टर) शोधन जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या अनधिकृत वैद्यकीय व्यवसायिक शोधन जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, उपजिल्हा पोलीस अधीक्षक, विविध पथकप्रमुख, तालुका आरोग्य अधिकारी, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक तसेच गट विकास अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरिदास यांनी सांगितले की, आतापर्यंत जिल्ह्यात अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या ६९ बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली असून, त्यापैकी १७ प्रकरणांचा तपास विविध पोलीस ठाण्यांत सुरू आहे, तर ३६ प्रकरणे न्यायप्रलंबित आहेत. यापुढे ग्रामीण व शहरी भागात विशेष मोहीम राबवून बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यात येणार असून, एकाही बोगस डॉक्टरला जिल्ह्यात मोकळे सोडले जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.कारवाई करताना संबंधित व्यावसायिकांची संपूर्ण माहिती तपासूनच कार्यवाही करावी, यापूर्वी गुन्हे दाखल असलेल्या प्रकरणांमध्ये न्यायालयाचा अवमान होणार नाही व शासन निर्णयांच्या अधीन राहूनच कारवाई करावी, असेही जिल्हाधिकारी पुजार यांनी स्पष्ट केले. छाप्यांच्या वेळी पंचांच्या समक्ष व्हिडिओ शूटिंग, छायाचित्रण, मुद्देमाल जप्ती करून त्यावर पंचांच्या सह्या घ्याव्यात, जप्त मुद्देमाल सीलबंद करून संबंधित पोलीस ठाण्यात जमा करावा तसेच स्थळपंचनामा स्वतंत्र फाईलमध्ये ठेवावा. ही कारवाई करताना संबंधित पोलीस ठाण्याचे ठाणेप्रमुख किंवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित असणे बंधनकारक असल्याचेही निर्देश देण्यात आले. सद्यस्थितीत जिल्ह्यातील आठ तालुक्यांच्या ग्रामीण भागात एकूण ४७६ वैद्यकीय व्यावसायिक कार्यरत असून धाराशिव १९४, तुळजापूर ५२, लोहारा २७, उमरगा ५४, कळंब ५१, भूम ३९, वाशी १५ आणि परंडा तालुक्यात ४४ डॉक्टर कार्यरत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

# सावधान..! लग्न जमवणाऱ्या टोळ्यांपासून सावध व्हा, हळदीसोबत लावला जातोय चुना

## ग्रामीण भागातील लग्नाळू तरुणांच्या फसवणूकीचे प्रकार वाढले; पालकांच्या हातबलतेचा घेतला जातोय गैरफायदा

अर्जुन गोडगे | आरंभ मराठी

परंडा - गेल्या काही काळात ग्रामीण महाराष्ट्रात एक नवीन प्रकारच्या फसवणुकीचे प्रकार समोर येत आहेत. ज्यात लग्नाच्या उमेदीत असलेल्या तरुणांना लक्ष्य करून संघटितपणे फसवणूक केली जाते. अलीकडेच परांडा तालुक्यातील परांडा पोलिस स्टेशन हद्दीतील यासंदर्भातील एक गंभीर घटना समोर आली आहे. या घटनेत रोसा गावातील दशरथ लक्ष्मण कोरे (वय ४२) यांना त्यांच्या लग्नासाठी ठरलेल्या कुटुंबाकडून सुमारे चार लाख रुपयांची फसवणूक झाल्याचाप्रकार उघडकीस आला. साधारणपणे या फसवणुकीची पद्धत अशी असते की, लग्नाच्या शोधात असलेल्या तरुण पुरुषांच्या कुटुंबाला 'मध्यस्थ' किंवा 'टोळी' चे सदस्य संपर्क साधतात. ते एक आदर्श वधूचे प्रस्ताव घेऊन येतात आणि लग्नाच्या आधी खर्च, भेटवस्तू, कपडेलत्ते इत्यादींच्या नावाखाली रक्कम उकळून घेतात. काही प्रसंगी तर 'कॅश डाव' (देणगी) म्हणून मोठी रक्कम हाती करून घेतली जाते. नंतर लग्नाच्या अगोदरच किंवा लग्नाच्या दिवशीच वधूची पार्टी अदृश्य होते. या फसवणुकीचे स्वरूप संघटित असून, गुन्हेगार गट ग्रामीण भागातील सामान्यतः शिक्षणाने मागासलेल्या किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या कुटुंबांना टार्गेट करतात. ते खोट्या ओळखपत्रांचा, फोटोंचा व खोट्या कागदपत्रांचा वापर करतात. 'लग्न' ही संवेदनशील आणि सामाजिकदृष्ट्या गंभीर बाब असल्याने बळी पडलेले कुटुंब लाजेमुळे किंवा सामाजिक अपमानाच्या भीतीने त्वरित तक्रार दाखल करत नाही, याचा फायदा गुन्हेगार उठवतात. अशा घटनांमुळे नुकसान केवळ आर्थिक नसते, तर तरुणाच्या मानसिक आरोग्यावर, कुटुंबाच्या सामाजिक प्रतिष्ठेवर आणि भविष्यातील लग्नासंदर्भातील विश्वासावर दीर्घकालीन परिणाम होतात. बळी झालेल्या दशरथ कोरे यांनीही लग्नाच्या आशेने



केलेला विश्वास आणि आर्थिक गुंतवणूक दोन्ही धुळीला मिळाले. केवळ अपवादात्मक प्रकरण वगळता प्रत्येक गावोगावी असेच प्रकार उघड होत आहेत. फक्त इज्जतीअभावी असे प्रकार पोलीस स्टेशनपर्यंत जात नाहीत. या बनावट लग्नाच्या टोळ्या व त्यांचे साथीदार वेगवेगळ्या जिल्ह्यातून असल्यामुळे एकदा फसवणूक झाली की ती रक्कम माघारी मिळणे अवघड होत आहे.लग्न म्हणजे सात जन्माचं नातं...' 'लग्न एकदाच होतं...' ही अशी वाक्यं आता केवळ पुस्तकी वाटावीत, अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. लग्न हे एक खेळ झाल्याची खात्री आता गेल्या काही दिवसात समोर येणाऱ्या बातम्यांमधून पुन्हा पुन्हा सिद्ध होतंय. आपल्याला प्रत्येक गावात किमान २०% तरुण ज्यांचं वय उलटला आहे पण लग्न झालं नाही असे मिळतील. आज ना उद्या लग्न होईल या अपेक्षेवर असणारे घरचे वेगवेगळे प्रयत्न करतात. त्यात मुली कमी असल्यामुळे फसवणुकीला सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्राचे लिंग गुणोत्तर प्रमाण दर हजार पुरुषांमागे ९२८ स्त्रिया असल्यामुळे मोठी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. ९० च्या दशकात विविध मराठी चित्रपटांची निर्मिती झाली. माहेरची साडी, भाऊबीज यासारखे अनेक चित्रपट येऊन गेले. यामध्ये लग्न झालेल्या स्त्रियांवर होत असलेले अत्याचार दाखवण्यात आले. मुलीला लग्न करताना खर्च करावा लागणार, हुंडा द्यावा लागणार त्यामुळे मुलगी नकोच ही मानसिकता वाढीस लागली. प्रत्येक तालुक्यात डॉक्टर सुदाम मुंडे उदयाला आले, गर्भनिदान यासारखे प्रयोग करून मुलींना गर्भातच संपवण्यात आले. त्याच गोष्टीची फळे आताचे लग्नाळू तरुण भोगत आहेत.

### लग्नाच्या बाजारात फसलेल्यांना तोंड दाबून बुक्क्याचा मार

लग्नासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या उतावळ्या नवऱ्यांना फसवेल तो आळशी एकच नवरी तीन तीन जणांशी विवाह, पण रातोरात होते फरार पण कुणालाही बोलताही येत नाही आणि सहनही होत नाही अशा अवस्थेत अडकलेल्या नवऱ्याला तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करण्याशिवाय पर्याय उरला नाही. भीक नको पण कुत्रा आवर अशी म्हणण्याची पाळी सध्या आली आहे. लुटार दुल्हन यासारखे गंभीर प्रकार ग्रामीण भागात घडत आहेत. परंतु, इज्जत जाईल या भीतीपायी तक्रार करण्यासाठीसुद्धा पुढे कोण येत नाही अशी परिस्थिती सध्या ग्रामीण भागात आहे. परंडा, बार्शी या भागात असंख्य तरुणाची फसवणूक झाली आहे. परंतु तक्रार देण्यासाठी कोणीही पुढे येत नाही.

### शुभमंगल म्हणण्यापूर्वी सावधान व्हा

शहानिशा केल्याशिवाय खात्री पटल्याशिवाय विश्वासू मध्यस्थशिवाय शिवाय लग्न करू नये. जास्तीत जास्त पुरावे माहिती संबंधित लोकांचे फोटो पडताळून पाहावेत, प्रमुखातल्या मुलींशी लग्न करताना विशेष काळजी घ्यावी. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्रास करून घेण्यापेक्षा आधीच चौकशी करावी अन्यथा तोंड दाबून बुक्क्याचा मार खाण्यापलीकडे काही उपाय नसणार आहे. फसवणुकीचे प्रकार उघड झाल्यावर आपली बदनामी होईल परत लग्न जमणार नाही यासारख्या दडपणात सध्याची पिढी आहे.

# पुजारी नगर फाऊंडेशनच्या वतीने महिलांसाठी विशेष हुर्डा पार्टी सहलीचे आयोजन




आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरातील पुजारी नगर फाऊंडेशनच्या वतीने रविवारी (दि.१४) महिलांसाठी विशेष हुर्डा पार्टी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. ही सहल सोलापूर येथील सिनाई कृषी पर्यटन केंद्रात उत्साहात पार पडली. या उपक्रमात सुमारे ४० महिलांसह मुलांनी सहभाग घेतला असून निसर्गाच्या सानिध्यात त्यांनी मनसोक्त आनंद आणि धमाल अनुभवली. सहलीदरम्यान पारंपरिक हुर्डा पार्टी, संगीतमय कार्यक्रम, गाणी, नृत्य तसेच विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. उपलब्ध स्पोर्ट्स ॲक्टिव्हिटींमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मैत्रीपूर्ण खेळ व उपक्रमांमुळे महिलांना दैनंदिन कामकाजातून विरंगुळा मिळाला आणि अनेक सुखद क्षण अनुभवता आले. मुलांसाठीही खास खेळांची व्यवस्था करण्यात आल्याने त्यांचाही आनंद द्विगुणित झाला. सिनाई कृषी पर्यटन केंद्रातील हिरवळीने नटलेल्या परिसरात ग्रामीण संस्कृतीची ओळख, निसर्गसौंदर्य आणि मनोरंजन यांचा सुरेख संगम साधण्यात आला. या सहलीमुळे महिलांमध्ये आपुलकी, सामाजिक सलोखा आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. दैनंदिन संसारिक दगदग, जबाबदाऱ्या आणि कामाच्या तणावातून काही काळ बाजूला होत महिलांनी स्वतःसाठी वेळ काढला. हुर्डा पार्टी व विविध मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होत त्यांनी मनसोक्त आनंद लुटला. या सहलीमुळे महिलांना मानसिक ताजेपणा मिळाला असून हसत-खेळत घालवलेले हे क्षण त्यांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय असाच राहिले. पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी व शुभांगी पुजारी यांनी या सहल विशेष उपक्रमाचे आयोजन केले होते. महिलांसाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे उपस्थित महिलांनी मनापासून कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे महिलांचे मानसिक आरोग्य सुदृढ होण्यास मदत होत असून सामाजिक सहभाग वाढीस लागतो, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# शिराढोणच्या पीएमश्री शाळेचे डॉ. होमी भाभा परीक्षेत घवघवीत यश

## मुक्ता ढासाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेची उल्लेखनीय कामगिरी

आरंभ मराठी । शिराढोण

कळंब तालुक्यातील शिराढोण येथील पी. एम. श्री आदर्श जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांनी शालेय स्तरावरील अत्यंत कठीण व गुणवत्तापूर्ण मानल्या जाणाऱ्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला. या परीक्षेच्या दुसऱ्या फेरीसाठी (प्रात्यक्षिक परीक्षा) सिद्धी राजेंद्र गुरव, समृद्धी सतीश शिंपले, विराट संघशील रोडे आणि श्रवण सचिन माकोडे या चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तसेच या परीक्षेत सानवी सचिन माकोडे, प्रद्युम्न शशिकांत चव्हाण, विराज रविशंकर टोपे, अक्षरा ज्ञानोबा जाधवर, समृद्धी अमोल दुगाने, स्नेहल अमोल सोमासे, समृद्धी धनंजय कापसे, संस्कृती दादासाहेब देशमुख, अक्षय सतीश सोमासे, दृष्टी दत्ता धाकतोडे, कृष्णा किशोर पांचाळ, वसुंधरा सच्चिदानंद यादव आणि मेघना प्रवीण कस्तुरकर हे विद्यार्थी पात्र झाले आहेत. या गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक मुक्ता ढासाळकर यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा ही केवळ पाठांतरावर आधारित नसून विद्यार्थ्यांची वैज्ञानिक जिज्ञासा,



निरीक्षण क्षमता, तर्कशक्ती व प्रयोगशीलता तपासणारी असल्याने या परीक्षेतील हे यश ग्रामीण भागातील शाळेसाठी विशेष उल्लेखनीय मानले जात आहे. या सर्व यशामागे शाळेचे मुख्याध्यापक सुनील अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान विषयाच्या आदर्श शिक्षिका मुक्ता ढासाळकर यांनी केलेले अथक परिश्रम कारणीभूत ठरले आहेत. मुक्ता ढासाळकर यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संकल्पना केवळ पुस्तकापुरत्या न ठेवता प्रत्यक्ष उदाहरणे, प्रयोग, प्रश्नोत्तर पद्धत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या माध्यमातून समजावून सांगितल्या. प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार वैयक्तिक मार्गदर्शन करत त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित केला. मर्यादित शैक्षणिक साधनसामग्री असूनही मुक्ता ढासाळकर यांनी नियोजनबद्ध अभ्यास, नियमित सराव चाचण्या, प्रयोगांची पूर्वतयारी तसेच पालकांशी सतत संपर्क ठेवून त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तयार केले. त्यामुळेच शिराढोण येथील पीएम श्री आदर्श जिल्हा परिषद शाळेने हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे, विज्ञान शिक्षिका मुक्ता ढासाळकर व मुख्याध्यापक सुनील अहिरे यांचे पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिकांकडून अभिनंदन होत आहे. ही कामगिरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही वैज्ञानिक क्षेत्रात मोठी भरारी घेता येते, याचे उदाहरण ठरले आहे.

# प्रेरणा बहुउद्देशीय महिला मंडळाकडून ऋतुजा जगताप यांचा सत्कार



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरातील कविता व नागनाथ जगताप यांची सुकन्या ऋतुजा जगताप ह्यांची एमपीएससी परीक्षेमध्ये तांत्रिक सहाय्यक अधिकारी पदी निवड झाली आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी हे यश संपादन केले आहे या यशाबद्दल नवनिर्मिती प्रेरणा बहुउद्देशीय महिला मंडळ सामाजिक संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. आजच्या काळामध्ये मुली कोणत्याही क्षेत्रात कमी नसून प्रत्येक क्षेत्रामध्ये त्या आपला ठसा उमटवत आहेत. अशा कर्तुत्ववान मुलीचा सत्कार करताना आम्हाला अभिमान वाटत असल्याचे उद्गार संस्थेच्या अध्यक्ष मीनाताई सोमाजी यांनी काढले. यावेळी कविता जगताप, संस्थेचा सचिव संध्या खूरूद, सुनिता काळे, रूपाली घाडगे, राधा घोगरे, लक्ष्मी राऊत आदी उपस्थित होत्या.

# मसापच्या धाराशिव शाखा कार्यकारणीचा विस्तार, विविध समित्या गठीत

आरंभ मराठी । धाराशिव

मराठवाडा साहित्य परिषद, धाराशिव या शाखेची कार्यकारणी विस्तार व विविध समित्या गठित करण्याकरिता बैठक नुकतीच संपन्न झाली. साहित्य परिषदेचे जेष्ठ मार्गदर्शक डॉ. अभय शहापूरकर, ज्येष्ठ सदस्य भा.न. शेळके, मसापचे विद्यमान अध्यक्ष नितीन तावडे व सचिव बालाजी तांबे यांच्यासह सर्व सदस्यांच्या उपस्थितीमध्ये खेळीमेळीच्या वातावरणात बैठक संपन्न झाली. मराठवाडा साहित्य परिषदेची धाराशिव शाखा ही कार्यतत्पर व उपक्रमशील शाखा म्हणून नावारूपाला आलेली आहे. या शाखेच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविले जातात. ते अधिकाधिक राबविता यावेत त्याचबरोबर त्यातील सातत्य राखता यावे, नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करणे सुलभ व्हावे याकरिता मार्गदर्शक म्हणून जेष्ठ सदस्य कमलताई नलावडे, एम. डी. देशमुख, भा. न. शेळके, राजेंद्र अत्रे, प्राचार्य डॉ. रमेश दापके, डॉ. अभय शहापूरकर, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख, जयराज खुणे, संदीपान कुंभार, प्राचार्य डॉ. सुलभा देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली. तर याच बैठकीमध्ये मसाप धाराशिव शाखेच्या कार्यकारिणीचा विस्तार करून उपाध्यक्षपदी मनीषा पोतदार, सहसचिव सुनीता गुंजाळ, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून हणमंत पडवळ, रवींद्र केसकर, विजय गायकवाड, उमाकांत कुलकर्णी, रवी निंबाळकर तसेच विविध समित्यांचे गठन करण्यात आले. त्यामध्ये कार्यक्रम समन्वयक समिती- शाम नवले, पंडित कांबळे, सुर्यकांत पाटील, राजेंद्र मडके, साहित्य प्रकाशन समिती- बाळ पाटील, कुंडलिक पवार, मधुकर हुजरे, सच्चिदानंद लोमटे, वाचनालय व्यवस्थापन समिती- रुपेशकुमार जावळे, समाधान शिकेतोड, अरुण कोरपे, अशोक माळी, बालकुमार साहित्य समिती-संजय धोंगडे, संगिता पोतदार, अश्विनी धाट यांची निवड करण्यात आली आहे. या सर्वांचे मसापच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. या बैठकीस मसाप शाखेचे कोषाध्यक्ष माधव इंगळे, शेषनाथ वाघ, सुवर्णा शिनगारे तसेच इतर सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी केले तर आभार रवींद्र केसकर यांनी मानले.

# वडिलांच्या मृत्यूनंतर मुलांच्या शिक्षणासाठी विधी सेवा प्राधिकरणाचा पुढाकार

**धाराशिवः**-वडिलांच्या मृत्यूनंतर दोन अपत्यांच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनलेल्या कुटुंबाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकारामुळे दिलासा मिळाला आहे. संबंधित कुटुंबास शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने सक्रिय भूमिका बजावून सामाजिक दायित्व निभावले. याबाबत अधिक माहिती अशी की, धाराशिव तालुक्यातील एका खेडेगावातील एका व्यक्तीने आत्महत्या केली होती. त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी तसेच वृद्ध आई-वडील असा परिवार आहे. घरातील कर्त्या पुरुषाच्या अकाली मृत्यूनंतर कुटुंबावर मोठे संकट ओढावले असून मुलांच्या पुढील शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (बालकांसाठीची बालस्नेही विधी सेवा) योजना २०२४ अंमलबजावणीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष श्रीमती अभिश्री देव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमार्फत जिल्ह्यातील १८ वर्षांखालील मुले, मुली व तृतीयपंथी यांच्या हितासंदर्भातील समस्या सोडविण्यासाठी कार्य केले जाते. हे प्रकरण समितीच्या सदस्या ॲड. अरुणा गवई यांच्या निदर्शनास येताच त्यांनी मृत व्यक्तीच्या पत्नीस आवश्यक कागदपत्रांसह सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धाराशिव यांच्याकडे मुलांच्या शिक्षणासाठी शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत विनंती अर्ज सादर केला. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी या अर्जाची तात्काळ दखल घेऊन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला व संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार यांनी संबंधित दोन्ही मुलांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्याची हमी दिली.तसेच जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांना प्रकरणाची माहिती देण्यात आली.

आरंभ मराठी

## स्वच्छता आणि सुरक्षा नसल्यामुळे उद्याने बनली तळीरामांचा अड्डा

# तुळजापूर शहरातील सार्वजनिक उद्यानांची अवस्था कधी सुधारणार ?

सूरज बागल । आरंभ मराठी

तुळजापूर - तुळजापूर शहरातील जवळपास सर्वच सार्वजनिक उद्यानांची दुरावस्था झाली असून गेल्या कित्येक दिवसांपासून याकडे नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे लहान मुले, जेष्ठ नागरिकांना, खेळण्यासाठी व फिरण्यासाठी जागाच उपलब्ध नसल्यामुळे सार्वजनिक उद्यानांची अवस्था असून अडचण नसून खोळंबा अशी झाली आहे. तुळजापूर शहरात मोठ्या संख्येने सार्वजनिक उद्याने उभारलेली आहेत. कोट्यावधींचा निधी खर्चून नागरिकांच्या सुविधेसाठी ही उद्याने उभा करण्यात आली होती. मात्र, गेल्या काही दिवसातील झालेल्या दुर्लक्षामुळे या उद्यानात मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता पसरली असून लहान मुलांच्या खेळण्याच्या साहित्याची तोडफोड झाली आहे. तसेच या उद्यानांना प्रकाश व्यवस्था तसेच सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे ही उद्याने तळीरामांचा अड्डा बनली आहेत. तुळजापूर शहराची एकूण लोकसंख्या 40,000 पेक्षा जास्त आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला यांच्यासाठी विरंगुळ्याचे चार क्षण घालवण्यासाठी ही उद्याने उपयुक्त ठरत असतात. त्यामुळे या उद्यानांमध्ये स्वच्छता मोहीम राबवून दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. तीर्थक्षेत्र असलेल्या तुळजापूर नगरीत एकही उद्यान सुस्थितीत नसल्यामुळे बाहेरगावाहून धार्मिक पर्यटनासाठी आलेल्या भाविकांना देखील तुळजापूर शहरात फेरफटका मारताना उद्यान उपलब्ध नसल्यामुळे त्यांचीही गैरसोय होते. आतापर्यंत प्रशासकराज असलेल्या नगरपालिकेने यासंदर्भात कुठलीच भूमिका घेतली नाही. मात्र, निवडून येणाऱ्या नगरसेवक आणि नगराध्यक्ष यांनी तुळजापूर शहरातील उद्यानांच्या संदर्भात भूमिका घेऊन त्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.





### उद्यानामध्ये अंधाराचे साम्राज्य

अनेक उद्यानांच्या संरक्षण भिंती तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे ही उद्याने रात्रीच्या वेळी तळीरामांचा अड्डा बनत आहेत. तसेच अनेक उद्यानांमध्ये प्रकाशाची व्यवस्था नसल्यामुळे तिथे अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे तिथे प्रकाश व्यवस्था करण्याची गरज आहे.

### सामानाची तोडफोड

उद्यानामधील सामानाची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून, त्यामुळे या उद्यानाकडे नागरिकांचे जाणे बंद झाले आहे. तसेच लहान मुले देखील या उद्यानांकडे जात नसल्याचे दिसून येत आहे. या उद्यानामध्ये लहान मुलांच्या करमणुकीसाठी चांगले सामान आणून बसविल्यास पालक आपल्या मुलांना उद्यानात घेऊन येऊ शकतात.

### उपद्रवी प्राण्यांचा धोका वाढला

अनेक उद्यानांमध्ये झाडेझुडपे व गवत मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे या उद्यानांमध्ये साप, विंचू, अशा प्राण्यांचा धोका वाढला आहे. आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांनाही याचा मोठा त्रास होत आहे. उद्यानामध्ये स्वच्छता करून त्याची योग्य निगा राखल्यास हा धोका कमी होऊ शकतो.

# एसटी चालक व वाहकाची दादागिरी, दूध उत्पादक शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक

## वैध पास असूनही उद्धट भाषा वापरून प्रवास करण्यास मनाई

आरंभ मराठी । नारंगवाडी

दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांकडे नियमांनुसार वैध पास असूनही एस.टी. बसमध्ये घेण्यास नकार देत चालक व वाहकांनी प्रवाशांशी दादागिरी करून अरेरावी करत धमकी दिल्याचा गंभीर प्रकार नारंगवाडी पाटी येथे उघडकीस आला. या घटनेत बसच्या समोरील बाजूस क्रमांक नसणे तसेच एसटी बसच्या वेळापत्रकाचाही उघड भंग होत असल्याचे स्पष्ट झाले असून, एस.टी. महामंडळाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सोमवारी (दि.15) सकाळी नारंगवाडी पाटी येथे औसा–लातूर–उमरगा–सोलापूर मार्गावरील औसा आगाराच्या एस.टी. बसमध्ये हा प्रकार घडला.

नारंगवाडी येथील एका नागरिकाचे घरगुती वापरासाठी असलेले दूध, नियमांनुसार वैध दूध पास असतानाही नारंगवाडी पाटी येथून बसमध्ये घेण्यात आले नाही. पुढे उमरगा येथे दूध देण्याची विनंती केली असता बसचे चालक व वाहक यांनी कोणतेही नियम न पाहता उद्धटपणे, अरेरावीने आणि मग्रुरीने नकार दिला. यावेळी वाहकाने जाहीरपणे तुमच्या बापाचे नोकर आहोत का? अशी अत्यंत अपमानास्पद, शिवराळ व धमकीची भाषा वापरून संबंधित नागरिकाचा सन्मान धुळीस मिळवला. इतकेच नव्हे तर चालकाने 'दूध फेकून देईन' असे बोलत प्रत्यक्ष दूध फेकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. हा प्रकार म्हणजे थेट गुंडगिरी व अधिकाराचा गैरवापर असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.घटनेदरम्यान पीडित नागरिकाने पत्रकारांशी बोलण्याचा उल्लेख करताच, "कुणाच्या बापाचा फोन असला तरी मी फोनवर बोलत नाही" अशी भाषा वापरून प्रशासनालाच आव्हान देणारे वक्तव्य चालक-वाहकांकडून करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच आरंभ मराठीचे प्रतिनिधी अमोल सुरवसे यांनी तत्काळ औसा आगार व्यवस्थापकांशी संपर्क साधला. मात्र त्यांनी 'अर्ज द्या' असे सांगून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात आणखी दोन गंभीर बाबी समोर आल्या आहेत. संबंधित एस.टी. बसच्या समोरील बाजूस बस क्रमांक स्पष्टपणे दर्शवलेला नव्हता. हा थेट परिवहन नियमांचा भंग असून, तक्रार व ओळख टाळण्यासाठीचा हा प्रकार असल्याची चर्चा आहे. तसेच या मार्गावरील बसचे ठराविक वेळापत्रकच नसल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे नारंगवाडी पाटी येथील प्रवाशांना दररोज मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून कारवाईची मागणी करण्यात येत आहे. संबंधित चालक व वाहकांना तात्काळ निलंबित करावे, शिस्तभंगाची कठोर कारवाई अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा तसेच माध्यमांद्वारे हे प्रकरण राज्यपातळीवर नेण्याचा इशारा देण्यात आला आहे. एस.टी. महामंडळाने या गंभीर प्रकाराची दखल घेऊन तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

आरंभ मराठी

''दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचा धर्मादाय परवाना रद्द करून सरकारने जमीन ताब्यात घ्यावी,'' अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीनं करण्यात आली आहे.

नेमकं काय म्हणाले संतोष शिंदे? : यासंदर्भात बोलताना संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते संतोष शिंदे म्हणाले, ''दीनानाथ मंगेशकर रुग्णालय धन दांडग्यांचे रुग्णालय आहे. श्रीमंतांशिवाय सामान्य माणसाला तिथं उपचार मिळत नाहीत. काल तनिषा भिसे नावाच्या गरोदर महिलेचा उपचाराअभावी मृत्यू झाला. त्यांची लेकरं पोरकी झाली. याला दीनानाथ मंगेशकर रुग्णालय जबाबदार आहे. महाराष्ट्र सरकारनं रुग्णालय प्रमुख, डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना तत्काळ अटक करावी. तसंच पुणे जिल्हाधिकारी आणि राज्य सरकारनं दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचा धर्मादाय परवाना रद्द करून सर्व जमीन सरकारच्या ताब्यात घ्यावी आणि रुग्णालय बंद करावं, अशी संभाजी ब्रिगेडची मागणी आहे. रुग्णालयाच्या प्रशासनाला माणसाचा जीव नाही तर पैसा जवळचा वाटत असेल तर अशांची तिथून हकालपट्टी करावी. अन्यथा संभाजी ब्रिगेड स्टाईलनं उत्तर दिलं जाईल,'' असा इशारा देखील यावेळी शिंदे यांनी दिला.

रुग्णालयाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त : दीनानाथ रुग्णालयाच्या बाहेर आज विविध संघटनांच्या आणि पक्षांच्या वतीनं प्रशासनाच्या विरोधात आंदोलन केलं जातय. या पार्श्वभूमीवर रुग्णालयाच्या बाहेर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलाय. दरम्यान, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेल्या प्रकारासंदर्भात चौकशी समिती नेमण्यात आली असून त्या समितीच्या माध्यमातून चौकशी करुन अहवाल सादर केला जाणार आहे. तसंच राज्य महिला आयोगानं देखील या प्रकरणाची दखल घेत पुणे महापालिकेच्या आयुक्तांना तथ्य तपासत चौकशी करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

विविध संघटना आणि पक्ष आक्रमक : दीनानाथ रुग्णालयाबाहेर दोन्ही शिवसेनेसह काँग्रेस आणि पतीत पावन संघटनेच्या वतीनं आक्रमक आंदोलन करण्यात आलं. यावेळी रुग्णालयावर चिल्लर फेकण्यात आली. तसंच पतित पावन संघटनेकडून रुग्णालयाच्या बोर्डाला काळं फासण्यात आलं.

### सुप्रसिद्ध अभिनेते पद्मश्री मनोज कुमार यांचं निधन : वयाच्या ८७ व्या वर्षी घेतला अखेरचा निरोप

मुंबई ४ एप्रिल (पीएसआय)

सुप्रसिद्ध अभिनेते मनोज कुमार यांचं मुंबईतील कोकीळाबेन रुग्णालयात निधन झालं. वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मनोज कुमार हे आपल्या प्रखर देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जात होते. त्यामुळेच त्यांना भारत कुमार असं म्हटलं जात होतं.

कोण होते मनोज कुमार : चित्रपट अभिनेते दिग्दर्शक मनोज कुमार यांनी प्रखर देशभक्तीपर चित्रपटांमध्ये अभिनय आणि निर्मिती केली. त्यामुळे त्यांना भारतकुमार अशी ओळख मिळाली. मात्र मनोज कुमार यांचं खरं नाव हरिकृष्ण गिरी गोस्वामी असं होतं. त्यांचा जन्म पाकिस्तानातील अबोटाबाद इथं २४ जुलै १९३७ रोजी झाला. अभिनेते मनोज यांनी सामाजिक आणि देशप्रेमावर आधारित असंख्य चित्रपटांची निर्मिती केली. सिनेविश्वात एक नवी वाट चोखाळली. प्रखर देशभक्तीपर चित्रपट केल्यामुळे त्यांची भारत कुमार, भारताचा सुपुत्र अशी ओळख निर्माण झाली.

हरिकृष्ण गिरी गोस्वामींनी का ठेवलं मनोज कुमार नाव : भारत आणि पाकिस्तान यांच्यात फाळणी झाल्यानंतर मनोज कुमार यांचं कुटुंबीय भारतात आलं. विद्यार्थी दशेत असताना त्यांना लोकप्रिय अभिनेता दिलीप कुमार आणि अशोक कुमार हे प्रचंड आवडायचे. महाविद्यालयात शिकताना त्यांनी दिलीप कुमार यांचा 'शबनम' चित्रपट पाहिला. या चित्रपटातील व्यक्तिरेखेमुळे ते प्रभावित झाले. त्यामुळे त्यांनी आपलं नाव मनोज कुमार असं ठेवलं. याच नावानं त्यांनी पुढच्या काळात अनेक चित्रपटात अभिनय करुन अनेक चित्रपटांची निर्मितीही केली. देशप्रेमानं भारवलेल्या तरुणाची भूमिका त्यांनी आपल्या चित्रपटातून साकारल्या. त्यामुळे त्यांना भारत कुमार अशी नवी ओळख मिळाली.

पंतप्रधान लाल बहादुर शास्त्रींपासून घेतली 'ही' प्रेरणा : पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांनी देशाला १९६५ मध्ये भारत–पाकिस्तान युद्धादरम्यान 'जय जवान, जय किसान'चा नारा दिला. १९६५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'शहीद' चित्रपटाच्या स्क्रिनिंगसाठी मनोज कुमार दिल्लीत गेले. या काळात अभिनेते मनोज कुमार यांनी लाल बहादूर शास्त्री यांची भेट घेतली. या भेटीत लाल बहादूर शास्त्री यांनी मनोज कुमार यांना ''तुम्ही सैन्य आणि सुरक्षेवर चित्रपट बनवता. मात्र देशाला पाठिंबा देणाऱ्या शेतकऱ्यांवर कोणताही चित्रपट बनत नाही, असं सांगितलं. त्यानंतर मनोज कुमार यांनी अवघ्या काही तासात 'उपकार' चित्रपटाची कथा तयार केली. या चित्रपटात मनोज कुमार, आशा पारेख, प्राण आणि प्रेम चोप्रा यांनी प्रमुख भूमिका साकारल्या. विशेष म्हणजे या चित्रपटातून त्यांनी दिग्दर्शनातही पदार्पण केलं. या चित्रपटाला प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला. या चित्रपटातील ''मेरे देश की धरती'' हे गाणं गेल्या सहा दशकापासून भारताच्या सर्व पिढ्या अभिमानानं ऐकत आल्या. या चित्रपटात मनोज कुमार यांनी भारत ही व्यक्तिरेखा साकारली. नंतरच्या असंख्य चित्रपटातून हाच भारत देशसेवा करत राहिला. आजही भारताचा स्वातंर्त्य दिन असो की प्रजासत्ताक दिन हे गाणं वाजत असते. 'उपकार' चित्रपटासाठी मनोज कुमार यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसेच त्यांचा पहिला फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कारही जिंकला.

### 'लिव्ह इन रिलेशनशीप'मध्ये राहणाऱ्या पीडितेवर प्रियकराच्या भावांचा बलात्कार: वाळूज पोलिसात गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर ४ एप्रिल (पीएसआय)

लिव्ह इन रिलेशनमध्ये असणाऱ्या प्रेयसीवर प्रियकराच्या भावांनीच चार वर्ष अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार वाळूज परिसरात उघड झाला आहे. विशेष म्हणजे लग्न न करता सोबत राहणाऱ्या या दाम्पत्याला दोन मुलं देखील आहेत. मात्र लहान मुलीवर वाईट नजर टाकण्याचा प्रयत्न केल्यानं पीडितीनं पोलिसात तक्रार देत प्रकरण उघडकीस आणलं. ''या प्रकरणी वाळूज पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे,'' अशी माहिती पोलीस निरीक्षक रामेश्वर गाढे यांनी दिली.

प्रियकरासोबत राहत होती 'लिव्ह इन रिलेशन'मध्ये : पीडित महिलेनं दिलेल्या तक्रारीनुसार, ती आठवीत शिकत असताना एका मुलासोबत तिचं सूत जुळलं. काही दिवसांनी कुटुंबीयांना ही बाब समजल्यानंतर त्यांनी २०१० मध्ये एका युवकासोबत पीडितेचा विवाह लाऊन दिला. ते वाळूज परिसरात जवळपास तीन वर्ष राहिले. मात्र पतीसोबत राहण्याची इच्छा नसल्यानं तिनं प्रियकरासोबत पळून जाणं पसंत केलं. त्यानंतर प्रियकरासोबत ती 'लिव्ह इन रिलेशन'मध्ये राहू लागली. त्यात त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी झाली. सध्या मुलाचं वय १३ वर्षे तर मुलीचे वय ६ वर्षे आहे. सहा ते सात वर्ष ती प्रियकरासोबत लिव्ह इन रिलेशनमध्ये राहिली. मात्र दरम्यान प्रियकराच्या तीन भावंडांनी वेगवेगळ्या वेळी तिच्यावर धाक दाखवत अत्याचार केल्याचा आरोप तिनं तक्रारीत नोंदवला.

चार जणांनी केला अत्याचार : काही वर्ष प्रियकरासोबत राहिल्यानंतर पीडिता काही वर्ष कुटुंबीयांसोबत एकत्रित देखील राहिली. त्यावेळी दोन भाऊ आणि चुलत भाऊ यांनी धाक दाखवत पीडितेवर अत्याचार केला. २०२४ मध्ये मोठ्या दीरानं तिच्या लहान मुलीला जवळ घेत अील चाळे केले. तिला वाचवायचं असेल तर माझ्यासोबत संबंध कर असा त्यानं धाक दाखवला. कुटुंबीयांना आणि नवऱ्याला सोडून इकडं आल्यानं कोणालाही अत्याचाराबाबत सांगू शकले नाही. लहान मुलीवर वाईट नजर टाकल्यानं अखेर तक्रार दिल्याचं पीडित महिलेनं सांगितलं. ''वाळूज पोलीस ठाण्यात पीडितेनं तक्रार दिल्यानंतर चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास करत आहोत,'' अशी माहिती वाळूज पोलीस ठाण्याचे निरीक्षक रामेश्वर गाढे यांनी दिली.

### आई–वडिलांना घराबाहेर काढणाऱ्यांनो सावधान! कोणतंही खर्च न करता ज्येष्ठ नागरिकांना आता मिळणार न्याय

पुणे ४ एप्रिल (पीएसआय)

सध्या शहरात गेल्या अनेक वर्षापासून जीवनशैली बदलल्याचं पाहायला मिळतंय. मुलं विदेशात शिक्षण घेतात आणि आई–वडील शहरात राहतात आणि मग लग्न झाल्यावर ते परत शहरात येतात, तर काही लोक हे एकत्र राहत असतात. लग्न झाल्यावर अनेक मुलं हे आपल्या आई–वडिलांना वृद्धाश्रम किंवा घराबाहेर काढण्याच्या घटना समोर येत आहेत. असं असताना आई–वडिलांच्या नावावर घर असतानादेखील वृद्ध आई–वडिलांना घराबाहेर जावं लागतं. मात्र आता अशा घराबाहेर केलेल्या आई–वडिलांना निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून मदत करून त्यांना परत घर दिलं जाणार आहे.

मुलाविरोधात कोर्टात जावं का असे अनेक प्रश्न : मुलांकडून आई वडिलांना घराबाहेर केल्यावर घर नावावर असतानादेखील आपण काय करावं, कोर्टात जावं का असे अनेक प्रश्न या ज्येष्ठ नागरिकांमध्ये निर्माण होतात, पण आता या ज्येष्ठ नागरिकांना ज्येष्ठ नागरिक निर्वाह कायदा, ज्याला 'आई–वडील आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह आणि कल्याण अधिनियम २००७' म्हणून ओळखले जाते, त्या कायद्याअंतर्गत मदत केली जाते. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम म्हणाल्या की, आपल्याकडे ज्येष्ठ नागरिक निर्वाह कायदा, ज्याला 'आई–वडील आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह आणि कल्याण अधिनियम, २००७' म्हणून ओळखले जाते, हा कायदा ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आहे. हा कायदा असून, याच्यात ज्या व्यक्तींना मुलं त्रास देतात किंवा त्यांना घरातून बाहेर काढतात, तसेच मुलं म्हणून त्यांना कोणतीही मदत करत नाहीत, त्या अनुषंगाने आपल्याकडे ज्येष्ठ नागरिक अर्ज करू शकतात आणि त्यांनी अर्ज केल्यावर त्यांना अशा प्रकरणात मदत केली जाऊ शकते. ज्यात मुलांकडून पोडगी दिली जाऊ शकते किंवा त्या आई–वडिलांच्या नावाने घर असेल तर त्या मुलांना घराच्या बाहेर काढून त्या आई–वडिलांना घर मिळवून दिलं जाऊ शकतं, असंही यावेळी कदम म्हणाल्यात.

महिन्याला साधारणत: हा २० ते २५ केसेस : त्या पुढे म्हणाल्या की, पुणे शहरात अशी प्रकरणे ही खूप वाढत असून, महिन्याला साधारणत: हा २० ते २५ केसेस या आमच्याकडे येत असतात आणि हा कायदा ज्येष्ठ नागरिकांसाठी असल्याने अशा प्रकरणात फक्त एका अर्जावर ज्येष्ठ नागरिकांना मदतही केली जाते. आज आमच्याकडे अशी प्रकरणे येत असतात, ज्यात पत्नीच्या सांगण्यावरून मुलं आपल्या आई–वडिलांना त्यांच्याच घरातून बाहेर काढतात. पण कायद्यानुसार, आई–वडिलांच्या नावावर घर असताना मुलं त्यांना बाहेर काढू शकत नाही. जानेवारीपासून आतापर्यंत कायद्याचा योग्य वापर करून ४२ ज्येष्ठ्यांच्या बाजूनं निर्णय घेऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू परत आणण्यात आलंय. सध्या शहरात अशा पद्धतीने आई वडिलांना घराबाहेर काढण्याचे प्रमाण हे खूप वाढतंय. ग्रामीण भागात हे प्रमाण खूपच कमी आहे. ज्या आई वडिलांना त्यांच्या स्वत: च्या नावावर जर घर असेल आणि त्यांच्या मुलांनी बाहेर काढलं असेल, त्यानं आमच्याकडे एक अर्ज करावं, त्यांना या कायद्याच्या अंतर्गत मदत केली जाणार असल्याचं यावेळी कदम यांनी म्हटलंय.

ते सन्मानाने आयुष्य जगू शकतील : ज्येष्ठ नागरिक निर्वाह कायदा, ज्याला 'आई–वडील आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह आणि कल्याण अधिनियम, २००७' म्हणून ओळखले जाते, हा कायदा ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आहे, जेणेकरून ते सन्मानाने आयुष्य जगू शकतील. या कायद्याअंतर्गत येणारी प्रकरणे ही आई, वडील आणि मुलगा– सून विरोधातील असतात. यावेळी निर्णय देताना सध्याची स्थिती लक्षात घ्यावी लागते. जानेवारीपासून ते आजपर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यातील ४२ प्रकरणात निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी निर्णय दिला असून, हा सर्व निर्णय ज्येष्ठांच्या बाजूने देण्यात आलाय. तसेच आई–वडिलांनी मुलांना संपत्ती बक्षीस पत्राद्वारे दिलेली असते. परंतु कालांतराने त्यांना ते पोसत नाहीत किंवा त्यांना घराबाहेर काढतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक हवालदिल होत आहेत, त्याला कायद्याच्या चौकटीत राहून त्याला न्याय दिला जाते.

### साई आश्रम निवासस्थानात सीआयएसएफ यंत्रणेचा मुक्काम; साई संस्थानच्या निर्णयावर भक्तांची नाराजी

शिर्डी ४ एप्रिल (पीएसआय)

शिर्डी साई संस्थाननं निमगाव हद्दीतील साई आश्रम फेज दोन मधील ण इमारत 'केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल'च्या (ण्घ्एइ) अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करून दिली आहे. ११ महिन्यांचा करार करुन प्रती खाट २० रुपये भाडे निश्चित करण्यात आले आहे. दरम्यान, शिर्डी विमानतळावर नाईट लँडिंग सेवा सुरू झाल्यानं अतिरिक्त सुरक्षा दलाची कुमक मागवण्यात आलीय. सीआयएसएफ कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी ही सुविधा देण्यात आल्याचं साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी स्पष्ट केलंय.

साई आश्रमात केवळ भाविकांनाच निवास मिळावा : साई संस्थानच्या निवास व्यवस्था या साईभक्तांच्या दानातून उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळं या ठिकाणी केवळ भाविकांचीच निवास व्यवस्था व्हावी, अशी मागणी होत आहे. रामनवमी उत्सवासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येणार असून त्यांची निवास व्यवस्था अपुरी पडण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी निवास सुविधा देणे भाविकांसाठी गैरसोयीचं आणि पवित्रतेच्या दृष्टीकोनातून चुकीचं असल्याचं साई संस्थानचे माजी विश्वस्त सचिन तांबे यांनी म्हटलंय.

भाविकांची गैरसोय? : यासंदर्भात प्रसार माध्यमांशी संवाद साधताना शिर्डीचे माजी नगरसेवक सुरेश आरणे यांनी, ''सध्या साई आश्रम फेज दोन मधील ण इमारत 'सीआयएसएफ'च्या (ण्घ्एइ) ताब्यात देण्यात आली आहे. भविष्यात इतर यंत्रणाही कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी साई संस्थानकडं मागणी करू लागल्यास भाविकांच्या गैरसोयीचा पायंडा पडू शकतो. त्यामुळं साई भक्तांच्या दानातून उभारलेल्या निवास व्यवस्थेचा उपयोग केवळ साईभक्तांसाठीच करावा, '' अशी भूमिका मांडली.

दानशूर साईभक्तानं व्यक्त केली नाराजी : चेन्नई येथील दानशूर साईभक्त के.व्ही. रमाणी यांनी एक अब्जाहून अधिक खर्च करत साई संस्थानला साई आश्रम एक आणि साई आश्रम दोन असे भक्त निवास शिर्डीत बांधून दिले. शिर्डीला येणाऱ्या भाविकांच्या राहण्याची गैरसोय होऊ नये, यासाठी हे भक्त निवास बांधून देण्यात आलं असल्याचं के.व्ही.रमाणी यांनी सांगितलं होतं. तसंच यासंदर्भात तयार करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये, साई आश्रम भक्त निवास फक्त भाविकांसाठीच वापरण्यात यावे असं नमूद करण्यात आलंय. दरम्यान, साई संस्थाननं भक्त निवासातील एक इमारत ण्घ्एइ कर्मचाऱ्यांना भाडेतत्त्वावर दिली असल्याची माहिती दानशूर भाविकाला समजताच त्यांनी आपली नाराजी व्यक्त केलीय. तसंच ''संस्थाननं करारनामा एकदा पहावा, '' असंही के.व्ही. रमाणी म्हणालेत.

### शहाजी बापू पाटील यांनी भर सभेत स्वत:च्या तोंडात चापट मारून घेतली अन् पिकला एकच हशा, नेमकं काय घडलं?

मुंबई ४ एप्रिल (पीएसआय)

शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा माजी आमदार शहाजी बापू पाटील हे त्यांच्या विधानामुळे कायमच चर्चेत असतात. राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जेव्हा बंडखोरी केली होती, तेव्हा त्यांच्याबरोबर शहाजी बापू पाटील हे देखील होते. तेव्हा गुवाहाटीतील एक डायलॉगमुळे शहाजी बापू पाटील चर्चेत आले होते. 'काय झाडी, काय डोंगर, काय हॉटेलष्ठ', त्यांचा हा डायलॉग राज्यभरात गाजला होता. यानंतर आता शहाजी बापू पाटील हे त्यांच्या एका कृतीमुळे पुन्हा एकदा चांगलेच चर्चेत आले आहेत.

माजी आमदार शहाजी बापू पाटील हे एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी शहाजी बापू पाटील यांनी भर सभेत स्वत:च्याच तोंडात मारून घेतल्याचं पाहायला मिळालं. त्यांच्या या कृतीने सभेत चांगलाच हशा पिकला होता. त्यांचा स्वत:च्याच तोंडात मारून घेतानाचा हा व्हिडीओही व्हायरल होत आहे. दरम्यान, माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी स्वत:च्याच तोंडात मारून घेतलं तेव्हा व्यासपीठावर सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह काही नेते देखील उपस्थित होते.

शहाजी बापू पाटील काय म्हणाले?

''ज्यांनी पाणी आडवण्याचं काम केलं, त्यांना तुम्ही खासदार म्हणून संसदेत पाठवलं. पण ज्यांनी तुम्हाला पाणी दिलं, त्यांना तुम्ही घरी बसवलं. त्यामुळे आपल्याला देखील काहीतरी वाटायला पाहिजे, आपल्या या चुकीमुळे आपण तोंडात मारून घ्यायला पाहिजे'', असं म्हणत शहाजी बापू पाटील यांनी भरसभेत स्वत:च्या तोंडात मारून घेतलं. शहाजी बापू पाटील यांच्या या कृतीवर सभेत एकच हशा पिकल्याचं पाहायला मिळालं.

'ही गोष्ट माझ्या काळजाला लागली'

सांगोल्यातील पाण्याच्या मुद्यावर बोलताना शहाजी बापू पाटील म्हणाले की, ''काय माणसं आहोत आपण? आपण काय केलं? ज्यांनी पाणी आडवलं त्यांना खासदार केलं आणि पाण्याशाठी ज्यांनी काम केलं, त्यांना घरी बसवलं. ही गोष्ट आपल्या काळजाला लागली'', असं म्हणत शहाजी बापू पाटील यांनी लोकसभेच्या निवडणुकीतील माढा लोकसभा मतदारसंघाचा संदर्भ दिला. लोकसभेच्या निवडणुकीत माढा लोकसभा मतदारसंघामधून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे धैर्यशील मोहिते पाटील हे निवडून आले, तर रणजित नाईक–निंबाळकर यांचा पराभव झाला. यावरूनच शहाजी बापू पाटील यांनी हे भाष्य केलं. 'तसेच आरडून ओरडून प्रश्न सुटत नाहीत. जनतेच्या विकासाची कामे करायची असतील तर सत्तेच्या जवळ असलं पाहिजे', असंही मत शहाजी बापू पाटील यांनी यावेळी व्यक्त केलं.

### तब्बल १७ राज्यांमध्ये वादळाचा इशारा, झारखंडमध्ये गारपीट; हैदराबादमध्ये तब्बल ९१ मिमी पाऊस, चारमिनारचे प्लास्टर उखडले; कर्नाटकच्या तापमानात ७.५ अंशांची घसरण

नवी दिल्ली ४ एप्रिल (पीएसआय)

हवामान खात्याने महाराष्ट्र, बिहार आणि छत्तीसगडसह १७ राज्यांमध्ये वादळ आणि जोरदार वाऱ्याचा इशारा जारी केला आहे. झारखंडमध्ये गारांसह पाऊस पडू शकतो. याशिवाय देशाच्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. गुजरातमध्ये उष्णतेची लाट आणि आर्द्रता कायम राहू शकते. दुसरीकडे, काल कर्नाटक, महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या विविध भागात पाऊस झाला. पावसानंतर कर्नाटकच्या कमाल तापमानात ७.५ अंशांपर्यंत घसरण झाली. इकडे राजस्थानमध्ये वादळ आणि पाऊस पाहायला मिळाला. मात्र, बाडमेर आणि जैसलमेर भागात उष्णता वाढू लागली आहे.

हवामान खात्याने महाराष्ट्र, बिहार आणि छत्तीसगडसह १७ राज्यांमध्ये वादळ आणि जोरदार वाऱ्याचा इशारा जारी केला आहे. झारखंडमध्ये गारांसह पाऊस पडू शकतो. याशिवाय देशाच्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. गुजरातमध्ये उष्णतेची लाट आणि आर्द्रता कायम राहू शकते. दुसरीकडे, काल कर्नाटक, महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या विविध भागात पाऊस झाला. पावसानंतर कर्नाटकच्या कमाल तापमानात ७.५ अंशांपर्यंत घसरण झाली. इकडे राजस्थानमध्ये वादळ आणि पाऊस पाहायला मिळाला. मात्र, बाडमेर आणि जैसलमेर भागात उष्णता वाढू लागली आहे.

दुसरीकडे, महाराष्ट्रात कडक उष्मा आहे, तर दुसरीकडे हवामान खात्याने हवामानात अचानक बदल होण्याचा इशारा दिला आहे. मराठवाडा आणि विदर्भात तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. दरम्यान, राज्याच्या अनेक भागात मुसळधार पाऊस, मेघगर्जनेसह गारपीट होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. राज्यात गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पाऊस आणि गारपीट होत आहे. बुधवारी पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, धाराशिव, लातूर, बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील दोन दिवस अवकाळी पावसाची शक्यता असून गारपीट होण्याचीही शक्यता आहे.

महाराष्ट्रावर उष्मा, पाऊस, धुके आणि गारपिटीचा तिहेरी हल्ला

उष्मा, पाऊस, धुके आणि गारपिटीचा तिहेरी हल्ला महाराष्ट्रावर होत आहे. वाढत्या तापमानामुळे विदर्भ–मराठवाड्यातील अनेक भागात उष्णतेसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे, तर दुसरीकडे पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. अनेक ठिकाणी रब्बी हंगामातील पिके काढणीसाठी तयार आहेत, मात्र अचानक वादळ, पाऊस आणि गारपिटीमुळे मोठे नुकसान होत आहे. मध्य महाराष्ट्रात चक्री वारे तयार झाले असून त्यामुळे येत्या २४ तासांत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी वारे आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुणे, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, सातारा, अमरावती, चंद्रपूर जिल्ह्यांत मेघगर्जनेसह वादळी वारे व गारपीट होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन हवामान खात्याने १५ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट (सावधान रहा) जारी केला आहे, तर राज्याच्या इतर भागात यलो अलर्ट देण्यात आला आहे.

### शिवरायांबद्दल अवमानजनक वक्तव्य, कायदा होणार, तारीख ठरली; गृहमंत्री अमित शाह रायगडावरुन घोषणा करणार

सातारा ४ एप्रिल (पीएसआय)

राज्यात गेल्या काही महिन्यांत महापुरुषांबद्दल अवमानजनक वक्तव केल्यावरुन राज्यभर संतापाची लाट पसरली होती. अभिनेता राहुल सोलापूरकर आणि तथाकथीत पत्रकार प्रशांत कोरटकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बेताल वक्तव्य केल्यानंतर शिवभक्तांनी त्यांच्यावर कारवाईची मागणी केली. त्यानंतर, या दोघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रशांत कोरटकर सध्या तुरुंगात आहे. मात्र, या घटनांवरुन सातत्याने तीव्र संताप होत असून छत्रपती घराण्यांचे वंशज उदयनराजे भोसले यांनीही यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. शिवाजी महाराजांबद्दल सातत्याने अवमानजनक वक्तव्य करणाऱ्यांना चाप बसवण्यासाठी यासंदर्भात कायदा करावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली होती. आता, लवकरच यासंदर्भात कायदा होणार असून स्वत: गृहमंत्री अमित शाह याची घोषणा करतील, असे खासदार उदयनराजे भोसले यांनी म्हटलं आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा वारंवार होणाऱ्या अवमानावरून भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी काही दिवसांपूर्वी राज्य सरकारला घरचा आहेर दिला. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वारंवार आक्षेपार्ह विधाने केली जातात, या मुद्यांवर बोलताना सरकार काय बोळ्याने दूध पितं का? असे म्हणत त्यांनी संताप व्यक्त केला होता. तसेच सर्व पक्षातील लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन एक विशेष अधिवेशन बोलवावं आणि तात्काळ कायदा पारित करावा, अशी मागणी देखील त्यांनी केली होती. तत्पूर्वी गृहमंत्री अमित शाह यांचीही त्यांनी भेट घेतली होती. आता, याबाबत त्यांनी माहिती देत रायगडावरुन या कायद्याची घोषणा होऊ शकते, असे म्हटले आहे.

या महिन्यात १२ तारखेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त किल्ले रायगडावर गृहमंत्री अमित शहा आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या माध्यमातून घोषणा होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्यांच्या विरोधात मी जी इच्छा व्यक्त केली होती, त्या कायद्याची घोषणा झाली तर याला वेगळं महत्व प्राप्त होईल, असे उदयनराजे भोसले यांनी म्हटलं आहे. त्यामुळे, १२ तारखेला अमित शाह रायगडावरुन या कायद्यासंदर्भात घोषणा करतील का, हे पाहावे लागेल.

अजामिनपात्र कायदा करावा

राज्य शासनाने तज्ज्ञांशी विचारविमर्श करुन, ऐतिहासिक दस्तावेजांचा योग्य अर्थ लावून, यापूर्वीच शिवछत्रपतींसह मराठा साम्राज्याचा शासनमान्य साधार इतिहास प्रसिध्द करणे गरजेचे होते. आज विकृत प्रवृत्ती असलेली व्यक्ती, त्याला जसे समजले, वाटते आहे अश्या पध्दतीने इतिहासातील प्रसंगाचे वर्णन करुन अकारण विवाद निर्माण करतो. अश्या प्रवृत्तींमुळे समाजामध्ये दुही पसरतेच परंतु राज्यातील देशातील कायदा आणि सुव्यवस्था देखिल बिघडते. शेजारी राहणाऱ्यांची मने कुलूषित होतात आणि त्याचे दिर्घ परिणाम समाजाला भोगावे लागतात ही वस्तुस्थिती आहे. आमच्या संयमाचा कडेलोट होण्यापूर्वीच राज्य व केंद्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि एकंदरीत मराठा साम्राज्याचा इतिहास अधिकृतपणे प्रसिध्द करावा त्याचबरोबरीने अश्या प्रवृत्तींच्या बाबतीत कायदेशीर कारवाई करता येणारा तसेच किमान १० वर्षाची शिक्षा असणारा अजामिनपात्र विशेष कायदा पारित करावा, अशी मागणीही उदयनराजेंनी निवेदनाद्वारे अमित शाह यांच्याकडे केली आहे.

### छ. शिवाजी महाराजांनी जो न्याय दिला असता, तसाच न्याय देशमुख कुटुंबाला मिळेल, योगेश कदम यांचा मस्साजोगमध्ये शब्द!

बीड४ एप्रिल (पीएसआय)

जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या न्यायालयीन सुनावणीला सुरुवात झाली असून देखील अद्याप आरोपी कृष्णा आंधळे हा पोलिसांना सापडला नाही. तर, दुसरीकडे आरोपी वाल्मिक कराडसह इतर आरोपींची पोलिसांकडून बडखास्त केली जात असल्याचा आरोप देशमुख कुटुबीयांकडून व आमदार सुरेश धस यांच्याकडून होत आहे. त्यामुळे, याप्रकरणी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची बदली करावी, त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणीही केली जात आहे. त्यातच, आज गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मस्साजोग गावात जाऊन देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. संतोष देशमुख खून प्रकरणाच्या तपासासंदर्भात देशमुख कुटुंबाशी त्यांनी संवाद साधला. यावेळी, धनंजय देशमुख आणि संतोष देशमुख यांची कन्या वैभवी यांनी योगेश कदम यांच्याशी चर्चा करत काही महत्त्वाची माहिती दिली. तसेच, संबंधित प्रकरणात पोलीस अधिकाऱ्यांचा अद्यापही हस्तक्षेप असल्याचं गृहमंर्त्यांच्या निदर्शनास आणून दिले.

योगेश कदम पहिल्यांदाच मस्साजोग गावात गेल्याने गावकऱ्यांनी संपूर्ण घटनेची माहिती गृहराज्यमंर्त्यांना दिली. आरोपीची गाडी वाशीकडे जात असताना ही माहिती पोलिसांना सांगून देखील याकडे दुर्लक्ष केले गेले. वाशी पोलीस स्टेशनचे पी.आय आणि केजचे पोलीस अधिकारी कर्मचारी यांना सह आरोपी केले पाहिजे, अशी मागणी गावकऱ्यांनी केली. त्यानंतर, अंबाजोगाईच्या अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या करा असे सूचना योगेश कदम दिल्या असून ज्यांच्यावर शंका आहे त्यां अधिकाऱ्यांना माफ केले जाणार नाही, असा गर्भित इशाराही त्यांनी दिला.

संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने देखील शंका असलेल्यांना सह आरोपी करण्याची मागणी कदम यांच्याकडे केली आहे. त्यावर, ज्यांनी सहकार्य केले त्यांना कडक शिक्षा